## ‘ई-२० इंधन उपयुक्त, परकीय चलनाची बचत, शेतकऱ्यांनाही लाभ’

**नवी दिल्ली :** ई–२० (२० टक्के इथेनॉल आणि ८० टक्के पेट्रोल यांचे मिश्रण) इंधनामुळे वाहनांचे इंजिन खराब होते किंवा फेल होते, असा कोणताही सिद्ध झालेला वैज्ञानिक किंवा तांत्रिक पुरावा नाही. व्यापक चाचण्या आणि प्रत्यक्ष वापराच्या अनुभवावरून इथेनॉल–मिश्रित इंधनाची उपयुक्तता सिद्ध झाली आहे, असे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी संसदेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.



पेट्रोलमध्ये इथेनॉलच्या मिश्रणामुळे भारताने आतापर्यंत सुमारे १,९८,००० कोटी रुपयांच्या परकीय चलनाची बचत केली आहे तसेच इथेनॉल उत्पादनामुळे देशातील ऊस व इतर धान्य उत्पादक शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फायदा झाला आहे. आतापर्यंत एक लाख कोटींपेक्षा जास्त रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात किंवा साखर कारखान्यांकडे वर्ग झाली आहे, असेही ते म्हणाले.


रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक १४
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, ३१ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग


शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीचे अडथळे होणार दूर/२

खुशबू ठाकरे मृत्यूप्रकरणी वैद्यकीय अधिकाऱ्यावर गुन्हा/५

क्रिकेटर अजिंक्य रहाणेची आंतरराष्ट्रीय निवृत्ती/८


# ड्रग्जविरोधात सामूहिक लढा आवश्यक

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

संरक्षण, तंत्रज्ञान आणि अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रात भारत वेगाने प्रगती करत असताना युवाशक्तीला अमली पदार्थांच्या विळख्यात अडकवून देशाला आतून कमकुवत करण्याचे षड्यंत्र रचले जात आहे. ड्रग्ज हे या छुप्या युद्धातील सर्वांत धोकादायक हत्यार असून त्याविरोधात सर्वांनी एकत्र येऊन सामूहिक लढा द्यायला हवा, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केले.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित ड्रग्ज फ्री मुंबई अभियानाचा शुभारंभ गुरुवारी (दि.३०) वरळी येथील एनएससीआय सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम (डोम) येथे पार पडला. यावेळी हजारो शालेय विद्यार्थ्यांना ड्रग्जमुक्त समाजाची



शपथ दिल्यानंतर मुख्यमंत्री बोलत होते.

"पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नशामुक्त भारताचा संकल्प केला असून त्या दृष्टीने मुंबई आणि महाराष्ट्र अमली पदार्थमुक्त करणे अत्यंत गरजेचे आहे," असे सांगून मुख्यमंत्री पुढे म्हणाले, "भारत आज जगात चौथी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. अवकाशात चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारा भारत हा अमेरिकेनंतरचा एकमेव देश ठरला आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) असो वा आधुनिक तंत्रज्ञान, भारत अग्रस्थानी आहे. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारताने आपली संरक्षण क्षेत्रातील ताकद जगाला दाखवून दिली आहे."

"सध्या जगात सर्वाधिक तरुणाई भारताकडे आहे आणि ही युवा शक्ती देशाचे भविष्य उज्ज्वल करू शकते. हेच शत्रू राष्ट्रांच्या डोळ्यांत खुपत आहे. त्यामुळेच तरुणाईला व्यसनाधीन करून देश आतून पोकळ करायचा, असा नवा पॅटर्न आणि छुपे युद्ध सुरू झाले आहे. या षड्यंत्राचे मुख्य शस्त्र अमली पदार्थ हेच आहे. याविरोधात सर्वांनी एकत्र येऊन सामायिक युद्ध पुकारणे आवश्यक आहे," असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

"वयाच्या २१ ते २२ वर्षांपर्यंत जर आपण कोणत्याही व्यसनापासून दूर राहिलो, तर आयुष्यात कधीच त्या वाटेला जात नाही. त्यामुळे तरुणांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता 'नाही' म्हणायला शिकले पाहिजे. कोणी जर 'यामध्ये मजा येते' असे सांगत असेल, तर 'ही मजा नाही, तर आयुष्य उद्ध्वस्त करणारी सजा आहे' हे सांगता आले पाहिजे," असा सल्ला मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

# जनहिताच्या कामांना भाजपचे प्राधान्य -आमदार प्रशांत ठाकूर

### पनवेलच्या शिवकर येथे विकासकामांचे लोकार्पण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जी कामे करायची ती जनतेसाठी आणि त्यांना समाधान मिळवून देण्यासाठी करायची, अशी भावना भारतीय जनता पक्षाची आहे. अशाच प्रकारे जनहिताच्या कामांना प्राधान्य देत पक्ष काम करीत आहे, असे प्रतिपादन भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी शिवकर येथे केले.

पनवेल तालुक्यातील शिवकर ग्रामपंचायत हद्दीत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या जिल्हा नियोजन निधीमधून करण्यात आलेल्या विविध विकासकामांचे लोकार्पण गुरुवारी (दि.३०) त्यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते झाले. या सोहळ्यात राजिप प्राथमिक शाळेच्या नवीन चार वर्गखोल्यांचे लोकार्पण करण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांची सोय झाली आहे तसेच अंगणवाडी क्रमांक २ आणि ३च्या नवीन इमारतींचेही उद्घाटन करण्यात आले, ज्याद्वारे बालशिक्षण आणि आरोग्याला चालना मिळणार आहे. यावेळी विद्यार्थ्यांना गणेवश वाटप करण्यात आले. याव्यतिरिक्त नव्याने बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीचेसुद्धा लोकार्पण करण्यात आले.

या कार्यक्रमाला पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, सदस्य राजेंद्र पाटील, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, भाजप अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, एकनाथ देशेकर, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, सरपंच आनंद ढवळे, उपसरपंच मंगेश ढवळे, ग्रामपंचायत सदस्य प्रांजळ पाटील, रितू पाटील, मोनिका पोपट, संतोष मते, मनीषा ढवळे, सुरेखा टोपले, रवींद्र ढवळे, रेश्मा पाटील, बीडीओ समीर वाठारकर, अभिजीत मटकर, गटशिक्षणाधिकारी शाहू सपकाळ, एन.के. गीते, मयूर शेळके, श्री गणपती देवस्थानचे अध्यक्ष गोपाळ पाटील, सदस्य चंद्रकांत ढवळे, पोलीस पाटील मिलिंद पोपेटा, भास्कर पाटील, माया पाटील, लक्ष्मण कांबळे, दत्तात्रेय ढवळे, शालिक पाटील, भरत टोपले, नामदेव तुपे, दत्तात्रेय पाटील, बबन ढवळे, गोटीराम ढवळे, तुकाराम टोपले, तुकाराम पाटील, वामन ढवळे, हरिश्चंद्र ढवळे, चंद्रकांत ढवळे, पुंडलिक ढवळे, तुकाराम ढवळे, त्रिंबक ढवळे, अरुण पाटील, वसंत ढवळे, धुळजी भोईर, जगदीश पोपेटा, भरत चौधरी, रोशन तुपे, अरविंद माळी, सागर ढवळे, पराग ढवळे, अक्षय पाटील यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये दर्जेदार सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जात आहेत. त्यामुळे या शाळांमध्ये चांगले शिक्षण मिळत असून येणारी पिढी ही अधिक सुशिक्षित आणि सक्षम होणार आहे, असा विश्वास व्यक्त केला.

# पनवेल मनपा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी नगररचना संचालकांशी सकारात्मक चर्चा



**पुणे : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध भागांचा विकास आराखडा, शहराचे नियोजन, बांधकाम परवानग्या व लेआऊट मंजुरी तसेच विकसकांना येणाऱ्या अडचणी अशा विविध विषयांवर पनवेल महानगरपालिकेच्या शिष्टमंडळाने गुरुवारी (दि.३०) नगररचना संचालनालयाचे संचालक जितेंद्र भोपळे यांची पुणे येथे भेट घेऊन सविस्तर व सकारात्मक चर्चा केली.

या बैठकीस पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम, माजी सभागृहनेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर उपस्थित होते.

पनवेलचा नियोजित, शाश्वत व सर्वसमावेशक विकास अधिक वेगाने करण्याच्या दृष्टीने विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी, शहरी नियोजन प्रक्रियेला गती, बांधकाम परवानग्यांमधील सुलभता, नागरिकाभिमुख विकासकामांना चालना देण्यासाठी आवश्यक अशा विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सकारात्मक विचारविनिमय करण्यात आला.

## अवैध गर्भपात रॅकेटचा पर्दाफाश

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूर येथील कदमवाडी रोडवरील प्रतिमा हॉस्पिटलवर गुरुवारी (दि.३०) पोलिसांनी धाड टाकून गर्भपाताच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश केला. या कारवाईत माजी सिव्हिल सर्जन डॉ. चंद्रकांत गायकवाड याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याने आजपर्यंत सुमारे २०० ते २५० बेकायदेशीर गर्भपात केल्याची धक्कादायक कबुली प्राथमिक चौकशीत दिली. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## निवडक

### नाशिकच्या दिलीप गावितची राष्ट्रकुल स्पर्धेत ‘सुवर्ण’ धाव

**ग्लासगो :** राष्ट्रकुल स्पर्धेत भारताने पॅरा ॲथलेटिक्समध्ये इतिहास रचला आहे. पुरुषांच्या १०० मीटर टी४७ अंतिम शर्यतीत नाशिक जिल्ह्याच्या आदिवासी पाड्यातील दिलीप महादू गावित याने १०.७१ सेकंदांत राष्ट्रकुल स्पर्धेतील विक्रमी आणि हंगामातील सर्वोत्तम वेळ नोंदवत सुवर्णपदक जिंकले, तर मोहम्मद बासिल मोरिंगानकथ याने १०.८३ सेकंदांची हंगामातील सर्वोत्तम वेळ नोंदवत रौप्यपदक पटकावले. **(सविस्तर ८ वर..)**

### आता ‘वंदे मातरम्’चा अपमान केल्यास तीन वर्षांचा तुरुंगवास!

**नवी दिल्ली :** आता भारताचे राष्ट्रीय गीत असलेल्या ‘वंदे मातरम’चा अवमान करणे कायदेशीर गुन्हा ठरणार आहे. तसे करणाऱ्याला तीन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. या संदर्भातील महत्त्वपूर्ण विधेयक गुरुवारी संसदेने मंजूर केले आहे. राज्यसभेत आधीच मंजूर झालेले हे विधेयक (दि.३०) लोकसभेतही ध्वनीमताने मंजूर झाले. आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या स्वाक्षरीनंतर या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होईल.

# श्रीवर्धनमध्ये डोंगरातून मोठा दगड लोकवस्तीत; सुदैवाने अनर्थ टळला



**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरात सोमजाई मंदिराच्या बाजूला असलेल्या धोंड गल्लीत गुरुवारी (दि.३०) दुपारी एक मोठा दगड अचानक डोंगरावरून घरंगळत खाली आला. एका बाईकमुळे तो दगड तिथे थांबला; अन्यथा त्या ठिकाणी दुर्घटना घडली असती.

श्रीवर्धनच्या धोंड गल्ली परिसरात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती आहे. हा परिसर डोंगरभागाचा आहे, मात्र येथे याआधी दरड कोसळलेली नाही, परंतु गुरुवारी दुपारी अचानक एक मोठा दगड घरंगळत खाली आला. एक मोटरसायकल उभी असल्याने हा दगड त्या ठिकाणी अडला गेला. त्यामुळे अनर्थ टळला. असे असले तरी या प्रकारामुळे येथील नागरिक धास्तावले आहेत. प्रशासनाने या घटनेसंदर्भात आवश्यक ती पावले उचलण्याची मागणी होत आहे.

# ‘रयत’च्या शाखाप्रमुखांची सहविचार सभा

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले मार्गदर्शन; गुणवंत शिक्षकांचा सत्कार





**कामोठे : रामप्रहर वृत्त**

आपले कामकाज वेळच्या वेळी करणे अत्यंत महत्त्वाचे असून शाळेचे कामकाज सुरळीत व गुणवत्तेने चालण्यासाठी प्रत्येक शिक्षकाने सतत जागृत राहणे गरजेचे आहे. सध्या काम उत्तम सुरू आहे आणि ते अधिक चांगल्या आणि प्रभावी पद्धतीने व्हावे यासाठी सर्वांनी अधिक लक्ष देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कामोठे येथे सहविचार सभेत केले.

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील रायगड विभागीय कार्यालयात गुरुवारी (दि.३०) शाखाप्रमुखांच्या सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सभेत विद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीचा सर्वंकष आढावा आणि भावी योजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. गुणवत्ता कक्ष अंतर्गत रायगड विभागातील शाळांना उत्कृष्ट मार्गदर्शन करणाऱ्या गुणवंत शिक्षकांचा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

या सभेला रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, सहाय्यक विभागीय अधिकारी विलास जगताप, लाईफ मेंबर प्रमोद कोळी, महेश पाटील यांच्यासह विविध शाळांचे प्रमुख, शिक्षक आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्याध्यापक एम.आर. पाटील, उपशिक्षक ए.पी. पाटील, एन.के. भगत, एस.एच. म्हात्रे, आर.व्ही. चिपळेकर, पी.पी. वाघोस्कर, एन.बी. म्हात्रे, मुख्याध्यापक देवेंद्र पाटील, तुषार म्हात्रे, विद्याधर पाटील, महेश पाटील, केवल पाटील, ज्योत्स्ना पाटील, सुहास नाईक, अविनाश घरत, निवृत्ती प्रबळकर, शैलेश ठाकूर, बालाजी डाढाळे या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

# कशेडी घाटात झूल पांघरलेल्या बकऱ्या वेधून घेताहेत लक्ष

**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांच्या सीमेवर वसलेल्या कशेडी घाटातील सह्याद्री पर्वतरांगेत बकऱ्यांनी झूल पांघरल्याचे दृश्य वर्षा पर्यटन करणाऱ्यांना पाहायला मिळत आहे. पावसापासून बचावासाठी हा प्रयोग आहे.

पोलादपूर तालुक्यातील पळचिल येथील माजी सरपंच वैशाली जाधव यांच्या बकऱ्यांचा कळप हिरव्यागार गवतावर चरण्यासाठी नेहमीप्रमाणे आला. त्यावेळी या सर्व बकऱ्यांनी रंगीबेरंगी आकर्षक झूल पांघरल्याचे दिसून आले.

याबाबत माहिती देताना जाधव यांनी सांगितले की, पावसाळ्यात जेव्हा हवेमध्ये गारवा वाढतो त्या काळात बकऱ्यांच्या केसाळ लोकरीत पावसाचे पाणी शिरून त्या गारठतात. ते लक्षात घेता बकऱ्यांना स्वच्छ व कोरडे पुसून जुन्या कापडांपासून गोधडीप्रमाणे वस्त्र शिवून बकऱ्यांच्या पाठीवर टाकल्यास त्यांच्यात उबदारपणा टिकून राहतो.

नवीन कपडे परिधान करणाऱ्या अवखळ आनंदी बालकांसारख्या या बकऱ्या सध्या पळचिल येथून फिरताना दिसत आहेत.



# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेलमध्ये ४ ऑगस्टला ‘ऋतू हिरवा’

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त जाणीव एक सामाजिक संस्था पनवेलच्या वतीने ‘ऋतू हिरवा’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पावसाळ्याच्या विविध छटांचा अनुभव देणारा हा अनोखा सांस्कृतिक कार्यक्रम ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे.



**पावसाळ्याच्या छटांचा अनुभव देणारा कार्यक्रम**

फक्त पाऊसगाणी नाहीत, तर पावसाच्या विविध २२ रूपांचा अनुभव देणारा असा हा कार्यक्रम असून रसिक प्रेक्षकांसाठी प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे. या कार्यक्रमाची संकल्पना आणि निवेदन अनघा मोडक यांचे आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या कार्यक्रमात संगीत, कविता, नाट्य आणि विविध कलाविष्कारांच्या माध्यमातून पावसाच्या विविध पैलूंना उजाळा देण्यात येणार आहे. जाणीव एक सामाजिक संस्थेचे संस्थापक–अध्यक्ष तथा महापौर नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम होणार आहे.

पनवेलमधील नागरिकांनी आणि कला रसिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा तसेच मोफत प्रवेशिकांसाठी महापौर नितीन पाटील जनसंपर्क कार्यालय (९३२३२६६१६३, ८४५१८४२९१९, ९८२०६६६७६८, ९८१९६७६५१८), पनवेल भाजप मध्यवर्ती कार्यालय (८०८०८२८१८२), अमोल स्टेशनरी, टिळक रोड (९८२०२३३३४९) येथे संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# कर्जत-लोणावळा तिन्ही रेल्वेमार्ग पूर्ववत

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

५ जुलैच्या अतिमुसळधार पावसामुळे कर्जत–लोणावळा घाटमार्गात अनेक ठिकाणी भूस्खलन, दगड कोसळणे आणि बंधारे, वाळू वाहून जाणे अशा घटना घडल्या. त्यामुळे तिन्ही रेल्वेमार्गांचे मोठे नुकसान होऊन सुमारे ६६५ रेल्वेगाड्यांवर त्याचा परिणाम झाला होता. अखेर २३ दिवसांच्या आव्हानात्मक दुरूस्ती मोहिमेनंतर हे तिन्ही मार्ग पुन्हा सुरू करून मुंबई आणि पुणेदरम्यानची रेल्वे वाहतूक पूर्ववत करण्यात मध्य रेल्वेला यश आले.

जोरदार पावसामुळे खंडाळा आणि मंकी हिलदरम्यान १३० मीटर लांबीचा भराव चार मीटरपर्यंत खचला होता. मंकी हिल आणि ठाकूरवाडीदरम्यान भूस्खलनामुळे संरक्षक भिंत कोसळून रेल्वेमार्गाचा सुमारे ५० मीटरचा भाग वाहून गेला. बोगदा क्र. ५१मध्ये पुरामुळे खडी वाहून गेल्याने रेल्वेमार्गाची रचना कमकुवत झाली होती.



त्यामुळे अनेक गाड्या रद्द करणे, मार्ग बदलणे, काही फेऱ्या कमी अंतरावर थांबवणे व वेळापत्रकात बदल करण्यात आले होते.

मध्य रेल्वेने पुनर्बांधणीचे काम पार पाडण्यासाठी रेल्वे कर्मचारी आणि कंत्राटी कामगारांसह ११,७४८ कर्मचाऱ्यांना कामाला लावले. खंडाळा आणि मंकी हिलदरम्यान अप मार्गावरील रेल्वेसेवा २८ जुलैला सायंकाळी ६.४२ वाजता सुरू झाली. अहोरात्र काम करून २३ दिवसांच्या या मोहिमेत अंदाजे १,४०,९४८ मनुष्यतास काम करून कर्जत–लोणावळा घाट विभागातील तिन्ही बंद मार्ग पुन्हा सुरू करण्यात आले आहेत.

# महाराष्ट्रात ३०० कोटी वृक्षारोपणाचा संकल्प -वनमंत्री गणेश नाईक

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत जागतिक व्याघ्र दिन साजरा



**नवी मुंबई : बातमीदार**

नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण करत वैज्ञानिक दृष्टीकोनातून व्याघ्र संवर्धनाची प्रभावी अंमलबजावणी राज्यात सुरू असून मूल्यप्रस्तावाधारित व्याघ्र संवर्धनासाठी शासन प्रयत्नशील आहे. यासाठी मानव–वन्यजीव संघर्ष कमी करणे, हरित उपजीविका अभियान, सीएसआरच्या माध्यमातून व्याघ्र संवर्धन, शाश्वत पर्यटन आणि वनसंवर्धनासाठी निधी उपलब्ध करणे अशा पंचसूत्रीची अंमलबजावणी करण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तर राज्यात ३०० कोटी वृक्षारोपणाचा ध्यास घेतला असून मोठ्या प्रमाणावर दर्जेदार रोपे उपलब्ध व्हावीत यासाठी राज्यात पाच ठिकाणी टिश्यू कल्चर प्रयोगशाळा उभारण्यात आल्याची माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी दिली.

आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिनानिमित्त वन विभागातर्फे नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्था (आयआयएम) येथे आयोजित परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वनमंत्री गणेश नाईक, शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी, वन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) श्रीनिवास राव तसेच कंबोडिया, भूतान आणि बांग्लादेशातील प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वाघ हा नैसर्गिक अधिवास आणि अन्नसाखळीचा केंद्रबिंदू असून त्याच्या संवर्धनामुळे पर्यावरण व वनांचे संरक्षण होते. राज्यातील सहा व्याघ्र प्रकल्पांच्या कोअर क्षेत्रातील गावांचे स्थलांतर करून नवीन बफर क्षेत्र विकसित करण्यात आले आहे. वन विभागाच्या नव्या धोरणामुळे पुनर्वसनासाठी स्थानिक नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत असून मानव–वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. व्याघ्रांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी कॅमेरा ट्रॅकिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित अर्ली वॉर्निंग सिस्टीम यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे.

**वाघांची वाढती संख्या**

२०१४मध्ये राज्यातील वाघांची संख्या १९० होती, ती वाढून ४४४ झाली असून नव्या व्याघ्र गणनेत हा आकडा ६००च्या पुढे जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जगातील सुमारे ७५ टक्के वाघ भारतात असून भारतातील वाघांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. गेल्या दोन दशकांतील सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे राज्य पहिल्या क्रमांकाकडे वाटचाल करत असल्याचेही त्यांनी सांगितले.

वनमंत्री गणेश नाईक म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली वन विभागाचा चेहरामोहरा बदलत असून व्याघ्र संवर्धनाबरोबरच विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. राज्यात ३०० कोटी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून मोठ्या प्रमाणावर गुणवत्तापूर्ण रोपे तयार करण्यासाठी पाच ठिकाणी टिश्यू कल्चर प्रयोगशाळा सुरू करण्यात आल्या आहेत.

वन विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाचे पूर्ण सहकार्य मिळत असून पर्यावरण संरक्षण, वनसंवर्धन आणि जैवविविधता जपण्यासाठी आधुनिक संकल्पनांची प्रभावी अंमलबजावणी केली जात असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी अशा परिषदांमुळे व्याघ्र प्रकल्पांतील पर्यटनाला चालना मिळून रोजगारनिर्मितीला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत वन विभागाने शाश्वत वन्यजीव पर्यटन, हरित अर्थव्यवस्था आणि व्याघ्र संवर्धनाला चालना देण्यासाठी आयआरसीटीसी, बायएफ, एचडीएफसी बँकेच्या परिवर्तन सीएसआर उपक्रमासह आरोहा ग्रुप, महिंद्रा हॉलिडेज अँड रिसॉर्ट इंडिया लिमिटेड आदी संस्थांसोबत एकूण ११ सामंजस्य करार केले तसेच समुदाय आधारित हरित उपजीविका, व्याघ्र संवर्धनासाठी सीएसआर गुंतवणूक, महाराष्ट्राला प्रमुख व्याघ्र पर्यटन गंतव्यस्थान म्हणून विकसित करणे आणि मनुष्य–वाघ सहअस्तित्व या विषयांवर तज्ज्ञांची सादरीकरणे झाली. व्याघ्र संवर्धनातील उल्लेखनीय कार्यासाठी एशियाटिक बिग कॅट सोसायटीचे राष्ट्रीय पुरस्कारही मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

# रोहा–तांबडी मार्गावर जीव मुठीत धरून प्रवास; प्रशासनाचे दुर्लक्ष

**धाटाव : प्रतिनिधी**



रोहा–तांबडी मुख्य जिल्हा मार्ग क्रमांक ५० हा पुन्हा एकदा गंभीर धोक्याच्या छायेत आला असून, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे डोंगरावरील भला मोठा दगड रस्त्यावर कोसळला असून, तो गेल्या तीन ते चार दिवसांपासून तसाच पडून आहे.

त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात मातीही रस्त्यावर घसरून आली आहे. विशेष म्हणजे, डोंगराचा उर्वरित भाग अजूनही सैल अवस्थेत असल्याने आणखी मोठे दगड, माती तसेच झाडे कोणत्याही क्षणी कोसळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

ही धोकादायक परिस्थिती असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाने अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नसल्याने वाहनचालक, प्रवासी आणि स्थानिक नागरिक संतप्त झाले आहेत.या मार्गावरून दररोज शेकडो वाहने, शालेय विद्यार्थी, रुग्णवाहिका तसेच अत्यावश्यक सेवांची वाहने ये–जा करतात. मात्र रस्त्यावर पडलेला दगड, खचलेली माती आणि वरून लोंबकळणारी झाडे यामुळे प्रत्येक प्रवास जीवघेणा ठरत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी आणि मुसळधार पावसात हा धोका अनेक पटींनी वाढत असल्याचे वाहनचालक सांगत आहेत.

गेल्या वर्षीही याच डोंगरातून आठ ते नऊ ठिकाणी मोठ्या प्रमाणात दरडी कोसळल्या होत्या. अनेक ठिकाणी झाडांसह प्रचंड दगड रस्त्यावर आल्याने वाहतूक ठप्प झाली होती. त्या घटनेतून प्रशासनाने कोणताही धडा घेतल्याचे दिसत नाही. यंदाही तशीच परिस्थिती निर्माण झाली असून, संभाव्य दुर्घटनेची चाहूल लागूनही प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आलेली नाही.

विशेष म्हणजे या रस्त्याला अनेक ठिकाणी अद्याप साईड पट्टीच नसल्याने एका बाजूला उंच डोंगर आणि दुसऱ्या बाजूला खोल दरी अशा धोकादायक परिस्थितीत वाहनचालकांना जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागत आहे. अशा परिस्थितीत जर अचानक दरड कोसळली किंवा झाड पडले, तर मोठी जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.धोकादायक दगड, माती आणि झाडे तात्काळ हटवावीत तसेच कायमस्वरूपी दरड प्रतिबंधक उपाययोजना कराव्यात अशी मागणी केली.

# महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे दोन दिवसांच्या अलिबाग दौऱ्यावर

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे ३१ जुलै आणि १ ऑगस्ट रोजी दोन दिवसांच्या रायगड जिल्हा, विशेषतः अलिबाग दौऱ्यावर येत असून या दौऱ्यात ते महसूल विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासह विविध विकासकामांची पाहणी करणार आहेत. तसेच नागरिकांच्या तक्रारी व निवेदनेही स्वीकारणार आहेत.

शुक्रवारी (दि. ३१) सकाळी ९.३० वाजता मुळे (ता. अलिबाग) येथील पाणंद रस्त्याची पाहणी करतील. सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकाऱ्यांसमवेत महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी तसेच भूमी अभिलेख विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेणार आहेत. दुपारी १.३० वाजता कुरुळ येथील माळी समाज हॉलमध्ये भाजपने आयोजीत आयोजित कार्यक्रमास ते उपस्थित राहतील. या कार्यक्रमात ते भाजप कार्यकर्त्यांशी संवाद साधतील.

शनिवारी (दि. १ ) सकाळी १०.३० वाजता अलिबागमधील चेंढरे येथे आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' आणि महसूल दिन कार्यक्रमास बावनकुळे उपस्थित राहतील. दुपारी १२ वाजता ते नागरिकांची निवेदने स्वीकारणार असून त्यानंतर राखीव कार्यक्रम पूर्ण करून दुपारी १.३० वाजता रत्नागिरीकडे प्रयाण करणार आहेत. महसूल विभागाच्या विविध योजनांचा आढावा, विकासकामांची पाहणी आणि नागरिकांच्या समस्या जाणून घेण्याच्या दृष्टीने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा हा दोन दिवसांचा अलिबाग दौरा महत्त्वाचा मानला जात आहे.

# अलिबाग शहरातील ११६पैकी ४७ सीसीटीव्ही कॅमेरे बंद; देखभाल दुरुस्तीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग शहरात तीन कोटी रूपये खर्चून बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही यंत्रणेतील ११६पैकी ४७ कॅमेरे बंद पडले आहेत. त्यांच्या देखभाल दुरुस्तीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसत आहे.

जिल्हा नियोजन विकास निधीतून नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत अलिबाग शहरात सिसीटीव्ही कॅमेरा बसवण्यास मंजूरी देण्यात आली होती. या नुसार अलिबाग शहर आणि आसपासच्या ग्रामपंचायतीमध्ये ३२ ठिकाणी ११६ सिसिटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले. यासाठी जवळपास तीन कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला होता. तत्कालीन पालकमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत या सीसीटिव्ही प्रणालीचा लोकार्पण सोहळा फेब्रुवारी २०२४ मध्ये पार पडला होता. मात्र दोन वर्षातच या सीसीटिव्ही यंत्रणेला बिघाडाचे ग्रहण लागले आहे. शहरातील ४७ कॅमेरे बंद पडले आहेत.

अलिबाग शहरातील सीसीटिव्ही यंत्रणेसाठी अलिबाग पोलीस ठाण्यात सुसज्ज कन्ट्रोल रूम उभारण्यात आली होती. ज्यात एकाच वेळी ६४ कॅमेऱ्यांचे चित्रिकरण पाहणे पोलीसांना शक्य झाले. शहरात प्रवेश करणाऱ्या आणि बाहेर जाणाऱ्या सर्व वाहनांची माहिती गाडी नंबरसहीत सॉफ्टवेअरच्या संकलित करण्याची सुविधा यामुळे उपलब्ध झाली. ज्याचा फायदा वाहतुक पोलीस आणि अलिबाग पोलीसांसाठी होऊ शकणार होता. समुद्र किनाऱ्यांवरील हालचालींवर पोलीसांना पोलीस स्टेशन मध्येच बसून लक्ष ठेवणे शक्य झाले होते.

# शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदली प्रक्रियेतील अडथळे होणार दूर

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदली प्रक्रियेत निर्माण झालेल्या अडचणींवर तोडगा काढण्यासाठी मंत्रालयात ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण उच्चस्तरीय बैठक पार पडली. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची शासनाने गंभीर दखल घेत ही बैठक आयोजित केल्याने राज्यभरातील बदलीच्या प्रतीक्षेत असलेल्या हजारो शिक्षकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

आंतरजिल्हा बदली प्रक्रियेत येणाऱ्या तांत्रिक अडचणी, रिक्त पदांचा प्रश्न, पात्र शिक्षकांना न्याय मिळण्यात होणारा विलंब तसेच प्रक्रिया अधिक पारदर्शक व सुलभ करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांनी मंगळवार, २८ जुलै २०२६ रोजी ग्रामविकास मंत्र्यांना सविस्तर निवेदन सादर केले होते. या निवेदनात बदली प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची आणि प्रलंबित प्रश्न सोडविण्याची जोरदार मागणी करण्यात आली होती.

या निवेदनाची तातडीने दखल घेत ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी २९ जुलै रोजी मंत्रालयात विशेष बैठक बोलावली. या बैठकीस ग्रामविकास विभागाचे सचिव, संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते.बैठकीत अध्यक्ष राजेश सुर्वे यांनी आंतरजिल्हा बदली प्रक्रियेतील विविध तांत्रिक त्रुटी, रिक्त पदांची सद्यस्थिती, नवीन शिक्षक भरतीचा बदली प्रक्रियेवर होणारा परिणाम आणि प्रक्रियेत आवश्यक सुधारणा याबाबत सविस्तर मांडणी केली. यावेळी शिक्षकांना न्याय मिळेल, अशी पारदर्शक आणि सुलभ बदली प्रक्रिया राबविण्याची मागणीही करण्यात आली.

बैठकीदरम्यान ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी बदली प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी सकारात्मक पद्धतीने सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन दिले. त्यामुळे दीर्घकाळापासून बदलीची प्रतीक्षा करणाऱ्या हजारो शिक्षकांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# वडघर पांगळोली स्वामी समर्थ साधना केंद्रात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यातील वडघर पंगोली या ठिकाणी असलेल्या स्वामी समर्थ साधना केंद्रामध्ये गुरुपौर्णिमा अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. जवळजवळ २३ ते २४ वर्षांपूर्वी वडघर पांगलोली या ठिकाणी काका तथा दीपक जोशी यांनी श्री स्वामी समर्थ मठाची स्थापना केली. सुरुवातीला श्री स्वामी समर्थांचा एक फोटो या ठिकाणी ठेवून त्याची नित्य नियमित पूजा व अर्चना करण्यात होती. त्यानंतर काही दिवसांनी स्वामी समर्थ यांची भव्य अशी मूर्ती त्या ठिकाणी स्थापित करण्यात आली. शिवसेनेचे तत्कालीन पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते स्वामी समर्थांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली होती. यावेळी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व तत्कालीन लोकसभा अध्यक्ष मनोहर जोशी हे सुद्धा या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

स्वामी समर्थ साधना केंद्राचे वैशिष्ट्य म्हणजे या ठिकाणी राशी व नक्षत्र वनस्पती यांची लागवड करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे अनेक विविध प्रकारच्या वनस्पती या ठिकाणी उपलब्ध आहेत. अतिशय निसर्गरम्य अशा या ठिकाणी स्वामी समर्थांचा मठ असल्यामुळे हजारो भाविक त्या ठिकाणी दर्शनासाठी येत असतात. आज गुरुपौर्णिमा असल्यामुळे स्वामी समर्थ साधना केंद्राचे संस्थापक दीपक तथा काका जोशी यांची उपस्थिती त्याठिकाणी होती. त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

गुरु पौर्णिमेचा कार्यक्रम साजरा होत असताना या ठिकाणी महाप्रसादाचे देखील आयोजन करण्यात आले होते. सालाबाद प्रमाणे खिचडी व एक गोड पदार्थ व मठ्ठा याचा महाप्रसाद सर्व भाविकांना देण्यात आला.




**कामोठे : सेक्टर १८ येथे डॉ. वैशाली रौनियार यांच्या व्हिवा फिजिओ क्लिनिकचे उद्घाटन पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला विजय रौनियार, विभा रौनियार, समाधान कासवीद यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.**

# महाडमध्ये शाळेबाहेरील धोकादायक वृक्षामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षितता धोक्यात

**महाड : प्रतिनिधी**

अतिवृष्टी आणि वादळी वाऱ्यांच्या तडाख्यामुळे महाड शहरातील अनेक वृक्ष धोकादायक अवस्थेत असून, शाळा परिसरासह प्रमुख रस्त्यांवरील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पावसामुळे कमकुवत झालेली झाडे, रस्त्यावर झुकलेल्या फांद्या आणि कोसळण्याच्या उंबरठ्यावर उभे असलेले वृक्ष यामुळे संभाव्य दुर्घटनेची भीती व्यक्त होत आहे.



महाड शहरात अनेक ठिकाणी धोकादायक फांद्यांची व वृक्षांची संख्या दिसत असून यामध्ये प्रामुख्याने कोएसो दगडूशेठ पार्टे इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्य प्रवेशद्वारा बाहेरील रस्त्यालगत असलेला मोठा वृक्ष नागरिकांच्या चिंतेचा विषय ठरला आहे. या वृक्षाच्या मोठ्या फांद्या संपूर्ण रस्त्यावर धोकादायकरीत्या झुकल्या असून, त्या कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. या मार्गावर दररोज शेकडो विद्यार्थी, पालक, शिक्षक, शाळेच्या बस, रिक्षा तसेच इतर वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. शाळा सुरू होण्याच्या आणि सुट्टीच्या वेळेत येथे मोठी गर्दी होत असल्याने एखादी दुर्घटना घडल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

नवेनगर शेडाव मार्ग, दस्तुरी नाका डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक मार्ग तसेच विविध अंतर्गत रस्त्यांवरील अनेक वृक्षांच्या फांद्याही धोकादायकरीत्या खाली झुकल्या आहेत, तर काही ठिकाणी त्या विद्युत वाहिन्यांच्या संपर्कात देखील आल्या आहेत.वादळी वाऱ्याचा वेग वाढल्यास वृक्ष कोसळून जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# राजिप शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय प्रशिक्षण

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डी आय इ टी ) आणि प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणार्या 'शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम' अंतर्गत जिल्हास्तरीय प्रशिक्षकांचे दोन दिवसीय प्रशिक्षण उत्साहात संपन्न झाले. २८ आणि २९ जुलै रोजी आयोजित जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यशाळेला मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी भेट देऊन प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे, गटविकास अधिकारी गजानन लेंडी, उपशिक्षणाधिकारी सुनील भोपळे, गट शिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे, केंद्रप्रमुख प्रमोद पाटील तसेच प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनचे कार्यक्रम प्रमुख (महाराष्ट्र) शंकर पौळ, जिल्हा प्रमुख शलाका पिंगळे आणि प्रथमची जिल्हास्तरीय टीम उपस्थित होती.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी, १०० दिवसांच्या लर्निंग इम्प्रूमेंट प्रोग्रामची प्रभावी अंमलबजावणी, निपुण चाचणीचे नियोजन, तालुकास्तरीय व केंद्रस्तरीय प्रशिक्षणांचे दर्जेदार आयोजन तसेच विविध स्वयंसेवी संस्थांच्या समन्वयातून जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्तेत भरीव सुधारणा घडवून आणण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. शाळांच्या गुणवत्ता वृद्धीसाठी प्रत्येक स्तरावर नियोजनबद्ध आणि परिणामकारक अंमलबजावणी करण्याचे निर्देश त्यांनी दिले. प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी विद्यार्थ्यांच्या मूलभूत भाषा व गणितीय संकल्पना दृढ करण्यासाठी भाषा पेटी आणि गणित पेटीचा प्रभावी वापर करण्यावर भर दिला.

प्रत्येक शनिवारी विद्यार्थ्यांना पेटीतील साहित्य व शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम वर्कशीट घरी सरावासाठी देणे, नियमित स्वाध्यायाची सवय विकसित करणे आणि शिकण्यात सातत्य निर्माण करण्यासाठी आवश्यक उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन त्यांनी केले.

# ड्रग्जपुरवठा करणारी तरुणी जेरबंद

## पनवेलमध्ये अमली पदार्थविरोधी पथकाची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल हद्दीत तरुणांना एम.डी. ड्रग्जचा पुरवठा करणाऱ्या २४ वर्षीय तरुणीला अमली पदार्थविरोधी पथकाने कामोठे येथून अटक केली आहे. प्राची नरेश बेकरे (२४) असे या तरुणीचे नाव आहे. काही दिवसांपूर्वी तस्करांना अटक केल्यानंतर त्यांच्या चौकशीतून तिचे नाव समोर आले होते.

खांदेश्वर पोलिसांनी ५ जुलै रोजी आसूडगाव येथील गोल्डन लॉजवर छापा मारला होता. या कारवाईत अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या लियाकत शोएब शेख, आकीब मोहम्मद सोहेल आणि राजा बिश्मा सरदार या तिघांना रंगेहाथ अटक करण्यात आली होती. लॉजमधील रूम नंबर ३०४ आणि ३०७ मधून पाच लाख ३७ हजार रुपये



किमतीचे ५.३७ ग्रॅम वजनाचे मेफेड्रॉन अर्थात एमडी, डिजिटल वजन काटे, रोख रक्कम आणि मोबाइल हँडसेट असा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता.

पुढील चौकशीत हे तिन्ही आरोपी लॉजवर राहून किरकोळ आणि घाऊक विक्री करीत असल्याचे उघड झाले. तसेच प्राची बेकरे ही तरुणी त्यांना गरजेनुसार थेट लॉजवर येऊन एमडी ड्रग्जचा पुरवठा करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. या माहितीच्या आधारे अमली पदार्थविरोधी पथक आणि खांदेश्वर पोलिसांनी सखोल तपास करून कामोठे येथे सापळा रचला आणि प्राची बेकरे हिला तिच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले. अमली पदार्थविरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांनी ही माहिती दिली. पुढील कारवाईसाठी आरोपीला खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# अपघातात रिक्षाचालक आणि प्रवासी जखमी

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

रिक्षा पलटी झाल्याने रिक्षातील चालक आणि प्रवासी जखमी झाल्याची घटना उरण ते पनवेल रोडवर पुष्पकनगरसमोरील ब्रिजच्या शेजारी घडली. या अपघातप्रकरणी व्हॅगनार कार चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात २६ जुलै रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील व्हॅगनार कारवरील चालकाने रिक्षाला (क्रमांक एम एच ४६ ए झेड ८७८६) मागून येऊन धडक दिली. या अपघातात रिक्षा पलटी होऊन अपघात झाला. यात रिक्षाचालक फिरोज कादिर शेख जखमी झाला तसेच रिक्षातील प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली. सकाळी पावणेदहाच्या सुमारास फिरोज शेख रिक्षात प्रवासी भरून पनवेलकडे येत होता. या अपघातात रिक्षाचे नुकसान झाले असून व्हॅगनार कारचालक रिक्षातील जखमी इसमांना मदत न करता पळून गेला.

# चोरीच्या एअर रायफल, पिस्टलसह आरोपी ताब्यात

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

कॅपिटल लँड या वेअर हाऊस कंपनीमधून एअर रायफल आणि एअर पिस्टल चोरणाऱ्या आरोपी प्रदोष प्रल्हाद पाटील (रा. साई) याला पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून सर्व मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

२२ जुलै रोजी पनवेल तालुक्यातील साई येथील कॅपिटल लँड या वेअर हाऊस कंपनीमध्ये वॉल्टर कंपनीचा एअर रायफल आणि एअर पिस्टल सुरक्षेसाठी ठेवण्यात आल्या होत्या. यातील २३



लाख रुपयांच्या आठ एअर रायफल आणि एअर पिस्टलची चोरी करण्यात आली. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिरुद्ध गिजे, पोलीस उपनिरीक्षक दीपक शेळके, पोलीस हवालदार देवरे, कुदळे, तांडेल, बाबर, पोलीस शिपाई भगत यांनी गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्ह्याचा तांत्रिक तपास केला आणि आरोपी प्रदोष प्रल्हाद पाटील याच्याकडे तपास केला असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली आणि चोरी केलेले एअर रायफल आणि एअर पिस्टल या त्याच्या ओळखीच्या लोकांना विक्री केले असल्याचे सांगितले. पोलिसांनी चोरीला गेलेला मुद्देमाल हरियाणा, तामिळनाडू, रत्नागिरी, पुणे, यवतमाळ येथे तपासासाठी पथके रवाना करून हस्तगत केला आहे.

# २५ वर्षांनी पुन्हा आले एकत्र!

## गव्हाण विद्यालयाच्या २०००-०१ बॅचचा भावनिक स्नेहमेळावा



**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये सन २०००-०१च्या दहावी 'अ' तुकडीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा रविवारी (दि.२६) उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. तब्बल २५ वर्षांनंतर एकत्र आलेल्या विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत आपल्या गुरुजनांप्रति कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयाला सुमारे १५,००० किमतीचे क्रॉम्प्टन कंपनीचे तीन उभे (स्टँडिंग फॅन्स) पंखे भेट देऊन सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. तीन उभे पंखे भेट देत भविष्यातही शाळेच्या विविध उपक्रमांना सहकार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. विद्यालयाच्या वतीने या भेटीबद्दल माजी विद्यार्थ्यांचे विशेष आभार मानण्यात आले. उपस्थित मान्यवर, शिक्षक व माजी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. विद्यालयात शिक्षण घेताना मिळालेले संस्कार, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि शालेय जीवनातील अविस्मरणीय आठवणींना यावेळी उजाळा देण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांचा सन्मान करून त्यांच्या ऋणाची जाणीव व्यक्त केली. तसेच दिवंगत सहाध्यायी प्रवीण पाटील, प्रकाश म्हात्रे व वर्षा कोळी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या स्मृतींना उजाळा देत दोन मिनिटे मौन पाळण्यात आले.

यावेळी विद्यालयाच्य या बॅचच्या तत्कालीन अध्यापिका असलेल्या व विद्यमान प्राचार्या तथा संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर यांनी विद्यार्थ्यांच्या यशस्वी वाटचालीचे कौतुक करताना "विद्यार्थी कितीही मोठे झाले तरी शाळेचा ऋणानुबंध अंतःकरणात सदैव जतन केलेला असतो," असे सांगून त्यांना समाजाप्रति जबाबदारी जपण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास विद्यमान कर्मचारी जनार्दन खैरे, अरुण कोळी व माजी शिक्षक नूरा शेख, शेख सर, भगत सर, एस. के. पाटील, माजी विद्यार्थी, त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देऊन आनंद व्यक्त केला.

# सीकेटीत गुरुपौर्णिमेनिमित्त वक्तृत्व स्पर्धा; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात (सीकेटी ज्युनिअर कॉलेज) सांस्कृतिक समितीतर्फे गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून 'राष्ट्र घडविण्यात गुरूंचे मोलाचे योगदान', 'शिक्षक ते गुरू ज्ञान, संस्कार आणि मार्गदर्शनाचा प्रेरणादायी प्रवास', 'आधुनिक समाजात गुरूंचा आदर काळाची गरज' या विषयांवर वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य प्रशांत मोरे, कला व वाणिज्य विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे, विज्ञान विभागाच्या पर्यवेक्षिका स्वाती पाटील यांच्या मार्गदर्शनाने व उपस्थितीने सदर स्पर्धेची औपचारिक सुरुवात करण्यात आली.

या स्पर्धेमध्ये उच्च माध्यमिक विद्यालयातील १०१ विद्यार्थी स्पर्धकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. स्पर्धेसाठी मराठी, हिंदी व इंग्रजी या तिन्ही माध्यमांतून विद्यार्थ्यांनी वक्तृत्व कौशल्य सादर केले.

स्पर्धेचे परीक्षण करण्यासाठी उच्च माध्यमिक विद्यालयातील सहाय्यक शिक्षक मारुती राजगोड (इंग्रजी माध्यम), संगीता देशमुख (हिंदी माध्यम), निखिलेश देशमुख (मराठी माध्यम) परीक्षक म्हणून उपस्थित होते. स्पर्धेचे सूत्रसंचालन कॉमर्स विभाग सहशिक्षिका योगिता जोरी यांनी केले. विद्यार्थी व शिक्षक यांच्या उपस्थितीत सांस्कृतिक समितीतर्फे सदर स्पर्धेचे अतिशय सुंदर आयोजन करण्यात आले होते.







पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे वाहनचालक राजू झांबरे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी संजय कोळी, दत्ता कुऱ्हाडे, राजेश सकटे, शरद ढोम आदी उपस्थित होते.

# गव्हाणच्या छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीत घवघवीत यश

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (UPS) इयत्ता ७ वी परीक्षेच्या अंतरिम निकालात रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधील दोन विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

आरोही बापू नाळे आणि प्रणव प्रशांत राणे हे दोन्ही विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले आहेत. आरोहीने दोन्ही पेपरमध्ये एकूण ३०० पैकी १५२ गुण मिळवून यश संपादन केले, तर प्रणवने ३०० पैकी १६२ गुण मिळवत विद्यालयाच्या गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. विशेष म्हणजे रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधीच्या वतीने घेण्यात आलेल्या आर.टी.एस. अर्थात रयत प्रज्ञाशोध परीक्षेतही अन्य काही विद्यार्थ्यांप्रमाणेच या दोन विद्यार्थ्यांनीही चमकदार कामगिरी केली असून प्रणव राणे शिष्यवृत्तीधारक



प्रणव राणे | आरोही नाळे

ठरला, तर आरोही नाळे ही पात्र ठरली आहे. दोन्ही विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर हे यश मिळविले.

त्यांच्या यशाबद्दल विद्यालयाचे आधारस्तंभ व रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, उच्च माध्यमिक विभागाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य तथा जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, विद्यालय स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, ॲड. राहुल घरत आणि विजयशेठ घरत, विद्यालयाच्या प्राचार्या तथा संस्थेच्या लाईफ वर्कर आणि माध्यमिक शिक्षण विभागाच्या समन्वय समिती सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक व संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, परीक्षा विभागप्रमुख दर्शना म्हात्रे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यालय व्यवस्थापनाच्या वतीने दोन्ही विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या यशामुळे छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून विद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा विभागाच्या प्रमुख दर्शना म्हात्रे आणि इतर मार्गदर्शक अध्यापकांचेदेखील सर्वत्र अभिनंदन आणि कौतुक होत आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात फॅकल्टी अँड स्टुडंट एक्सचेंज प्रोग्रॅम उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संगणकशास्त्र विभागाच्या वतीने गुरुवारी (दि. ३०) सकाळी १० वाजता लॅब क्र. ५ येथे एमजीएम महाविद्यालय, कामोठे यांच्या सहयोगाने द्वितीय व तृतीय वर्ष बीएस्सी. (संगणकशास्त्र) विद्यार्थ्यांसाठी शिक्षक व विद्यार्थी आदान-प्रदान कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रख्यात तज्ज्ञ डॉ. पुनित बाजपेयी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

त्यांनी प्रकल्प विकास, उदयोन्मुख तंत्रज्ञान, शैक्षणिक सहकार्य, संगणकशास्त्रातील करिअरच्या विविध संधींविषयी



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यामुळे विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण संकल्पना विकसित करण्याची प्रेरणा मिळाली. शिक्षक आदान-प्रदान कार्यक्रमांतर्गत संगणकशास्त्राच्या सहाय्यक प्रा. शिवानी सोनकर यांनी एमजीएम महाविद्यालय, कामोठे येथे सायबर सुरक्षा विषयावर व्याख्यान दिले. यातून विद्यार्थ्यांना सायबर धोके, ऑनलाइन सुरक्षा व सध्याच्या सायबर सुरक्षा प्रवाहांविषयी माहिती मिळाली.

कार्यक्रमाचा उद्देश दोन्ही महाविद्यालयांतील शिक्षक व विद्यार्थ्यांना ज्ञान, अनुभव आणि उत्तम शैक्षणिक पद्धतींची देवाणघेवाण करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा होता. कार्यक्रमादरम्यान झालेल्या संवादात्मक चर्चेमुळे विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढला व दोन्ही संस्थांमधील शैक्षणिक सहकार्य अधिक दृढ झाले. यामुळे विद्यार्थ्यांच्या तांत्रिक ज्ञानात, संवाद कौशल्यात, आत्मविश्वासात आणि उद्योग क्षेत्रातील नव्या घडामोडींबाबतच्या जाणिवेत लक्षणीय वाढ झाली. शिक्षक व विद्यार्थ्यांमधील परस्पर सहकार्य आणि सुसंवाद बळकट झाला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल संगणकशास्त्र विभागाने त्यांचे आभार मानले. संगणकशास्त्राच्या विभागप्रमुख प्रा. रिझवाना मोमीन तसेच विभागातील इतर सर्व सदस्य प्रा. सोनी पांडे, प्रा. गीतांजली ठाकूर, प्रा. मृणाली आवळे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजन आणि घेतलेल्या परिश्रमाबद्दल विभागाने त्यांचे विशेष कौतुक केले.

# 'सीकेटी'त गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुवंदना आणि सांस्कृतिक कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगू काना ठाकूर विद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त विशेष कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व गुरूंच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी गुरुवंदना, भक्तिगीते, भाषणे, कविता आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून गुरुजनांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. प्रार्थना व स्वागत गीत विद्यालयाच्या गायक वृंदाने सादर केले. सर्व पाहुण्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.

पाहुण्यांचा परिचय



प्राची इसे यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे यांनी केले. गुरूंना वंदन म्हणून गायन वृंदाने गाणे सादर केले. होमी भाभा परीक्षेसाठी शिक्षकांचा सत्कार यावेळी करण्यात आला. त्यामध्ये स्वाती काळे, वैशाली लाउत्रे, कीर्ती झावरे, प्राची इसे, कविता घाडगे यांचा समावेश होता. दुर्वा चव्हाण या विद्यार्थिनीने गुरुपौर्णिमेनिमित्त भाषण केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व मांडत नाटक सादर केले. आठवीच्या विद्यार्थिनींनी नृत्याचे सादरीकरण केले. उपस्थितांनी सादरीकरणाचे कौतुक केले. शिक्षिका गायत्री पाटील यांनी भाषण सादर केले. कार्यक्रमानिमित गायक गटाला बॅजचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमास उपस्थित संस्थेचे शाळा निरीक्षक आणि विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना तुमच्या शिक्षकांचा आजच नव्हे तर दररोज आदर करा. कुतूहलाने शिका. प्रश्न विचारा. चांगला विद्यार्थी चांगल्या गुरूचा अभिमान बाळगतो. जेव्हा तुम्ही यशस्वी व्हाल तेव्हा त्या व्यक्तीचे आभार माना, असे सांगत विद्यार्थी अधिक समर्पणाने अभ्यास करतील आणि शिक्षक अधिक उत्कटतेने मार्गदर्शन करत राहतील, अशी प्रतिज्ञा आपण आजच्या दिवसाला स्मरण करून घेऊया, असे आवाहन केले.

प्रमुख पाहुणे दीपक कन्हेरे यांनी मार्गदर्शनपर भाषणात गुरूंचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील स्थान आणि संस्कारांचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमास मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षिका वैशाली पारधी, नीरजा मॅडम यांनी उपस्थिती दर्शविली. सूत्रसंचालन निधी पाटील, सेजल शेळके व रिंकल पाटील या विद्यार्थिनींनी केले. उपस्थितांचे आभार स्नेहल जाधव यांनी मानून कार्यक्रमाची सांगता पसायदानाने करण्यात आली.

# गुरुपौर्णिमा, देवकीमाता मंदिर वर्धापन दिनानिमित्त वृक्षरोप वाटप; द्वारकाधीश चॅरिटीजचा स्तुत्य उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

द्वारकाधीश चॅरिटीज ट्रस्टच्या वतीने गुरुपौर्णिमा आणि श्री देवकीमाता मंदिर वर्धापन दिनानिमित्त आपटा फाटा येथील द्वारकाधीश मंदिर येथे वृक्षरोप वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी बानूबाई वाडी येथील ५० आदिवासी लाभार्थ्यांना प्रत्येकी एक हापूस कलमांच्या रोपांचे वाटप करण्यात आले.

सध्याच्या वातावरण बदलामुळे अनेक ठिकाणी अनियमित पाऊस पडत आहे. मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड थांबली पाहिजे त्याचबरोबर वृक्षलागवड आणि संवर्धन आपण केले पाहिजे ही काळाची गरज आहे, हा संदेश तुम्हीदेखील इतरांना सांगा, अन्यथा सर्वांनाच निसर्गाच्या प्रकोपाला सामोरे जावे लागेल एवढेच उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून आजचा कार्यक्रम आयोजित केला आहे, असे मत संस्थेचे अध्यक्ष अजित कारखानीस यांनी व्यक्त केले.



अर्चना ट्रस्टचे सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत यांनी संस्थेनी दिलेली रोपे आम्ही १०० टक्के जगवू, अशी ग्वाही लाभार्थ्यांच्या वतीने दिली. वाडीतील लाभार्थी संतोष हापसे यांनी संस्थेचे अध्यक्ष, सदस्य आणि उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले. यावेळी सौ. कारखानीस, आनंद देशमुख, ममता मांजरेकर, कामाक्षी कुडवा, गोगटे काका, डॉ. मयुरेश पिंपुटकर, नंदन शिरोडकर, योगेश ताटे आणि मोठ्या संख्येने आदिवासी लाभार्थी उपस्थित होते.

## संपादकीय

# कारवाईमागे जनहितच

एफडीए अर्थात अन्न व औषध प्रशासनाच्या सध्याच्या कठोर कारवाईबद्दल सर्वसामान्य लोकांमध्ये बहुतांशी स्वागताची भावनाच असून विशेषतः शाळांच्या परिसरात जंक फूडवर बंदी घालण्याच्या निर्णयाला समस्त पालकवर्गाचा मोठा पाठिंबा दिसतो आहे. ही एकंदरच कारवाई कुठल्याही निवडक ठिकाणी नसून सार्वजनिक आरोग्याशी तडजोड न करण्याचा राज्य सरकारचा दृष्टिकोन या मोहिमेमागे आहे.

**गेले काही दिवस राज्यात अन्न व औषध प्रशासन म्हणजेच एफडीएने हाती घेतलेली धडक मोहीम बरीच गाजते आहे. मुंबई तसेच राज्यभरातील अनेक हॉटेले, उपाहारगृहे, जिमखाने, कॅन्टीन आणि खाद्यआस्थापनांवर एफडीएने छापे टाकले आहेत तर नुकताच शाळांच्या परिसरात जंक फूडवर बंदी घालण्याचा निर्णयही एफडीएने घेतला. एफडीएच्या छाप्यांमध्ये अनेक ठिकाणी अस्वच्छ स्वयंपाकगृहे, कीटकांचा प्रादुर्भाव, अन्नसाठवणुकीतील आक्षेपार्ह त्रुटी आणि अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन आढळले. त्यानंतर एफडीएने खाद्यपरवाने निलंबित करण्याची कठोर कारवाई केली. ही केवळ हॉटेले किंवा खाद्यव्यावसायिकांवरील कारवाई नसून नागरिकांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठीच ही व्यापक मोहीम सुरू आहे. अर्थात या मोहिमेसंदर्भात काही प्रश्नही उपस्थित केले जात आहेत. नवी मुंबईतील एका हॉटेलचा खाद्यपरवाना निलंबित करण्याच्या एफडीएच्या निर्णयावर मुंबई उच्च न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित करत कारवाई वास्तववादी असावी असे म्हटले आहे. कायद्याची कठोर अंमलबजावणी करताना ही अंमलबजावणी न्याय्य, पारदर्शक व सर्वांसाठी समान असणे आवश्यक आहेच. शाळांच्या परिसरात जंक फूडवर बंदी आणण्याच्या एफडीएच्या निर्णयाचे मात्र पालकांकडून मोठ्या प्रमाणात स्वागत झाले. राज्यातील सर्व शाळांच्या आवारात आणि ५० मीटर परिसरात वडापाव, समोसे, शीतपेये, चॉकलेट्स, आईस्क्रीम यांसारख्या जंक फूडच्या विक्री, वितरण आणि जाहिरातींवर बंदी घालण्याचे आदेश एफडीएने दिले आहेत. सरकारी आणि खासगी अशा सर्व शाळांना हे नियम लागू राहणार असून त्यांच्या अंमलबजावणीची जबाबदारी शाळा व्यवस्थापनावरही असणार आहे. शाळकरी मुलांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढत असलेला लठ्ठपणा, मधुमेहाची पूर्वलक्षणे आणि चुकीच्या आहारपद्धतींच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय अत्यावश्यकच होता अशी पालकांची भावना आहे. मुलांमध्ये लहानपणापासूनच आरोग्यदायी आहाराच्या सवयी रुजवणे आवश्यक असते. बरेचसे पालक त्यादृष्टीने प्रयत्नशीलही असतात, तर काहींना नोकरी-व्यवसायाच्या ताणामुळे ते शक्य होत नाही. त्यामुळेच शाळांच्या परिसरात मुलांच्या आरोग्यास अपायकारक असे पदार्थ उपलब्धच असू नयेत याची दक्षता घेतली जाणे हा सुयोग्य निर्णय असल्याचे पालकांना वाटते. बाकी न्यायालयाच्या सूचनांचा आदर राखत एफडीएने आपल्या कारवाईत आवश्यक काटेकोरपणा अवश्य राखावा. दोषींवर ठोस कारवाई आणि नियमांचे पालन करणाऱ्या व्यावसायिकांना न्याय्य वागणूक याचा समतोल साधणे हीच प्रशासनाची खरी कसोटी ठरणार आहे. पूर्वसूचना न देता एफडीएकडून कारवाई केली जात असल्याबद्दल काही हॉटेल व्यावसायिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. परंतु ग्राहकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये निर्णय तातडीनेच घ्यावे लागतात. दूषित अन्नामुळे पसरणारे आजार आणि विषबाधेचे प्रकार यांची किंमत सामान्य नागरिकांनाच मोजावी लागते. राज्य सरकारने आरोग्य, स्वच्छता आणि अन्नसुरक्षा या विषयांना प्राधान्य दिले असल्याचे या कारवाईतून स्पष्ट होते. अर्थात निव्वळ एकदाच कारवाईचा गाजावाजा करून थांबण्याऐवजी नियमित तपासण्या, जनजागृती व शाळांमध्ये पोषण शिक्षण यावर भर दिला गेला पाहिजे. यासंदर्भात कायद्याच्या कठोर अंमलबजावणीसोबतच नागरिकांचा सहभागही तितकाच आवश्यक आहे.**

# डिजिटल नकाशांतून जलसमृद्धीकडे!





प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.०अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी अत्याधुनिक भौगोलिक माहिती प्रणाली (Geographic Information System GIS) विकसित करून राज्यातील ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशे यंत्रणेच्या वेबसाईटवर प्रथमच सर्वसामान्यांसाठी विनामूल्य उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे पाण्याचे शास्त्रशुद्ध नियोजन, भूजल पुनर्भरण, जलसंधारणाची प्रभावी अंमलबजावणी आणि ग्रामस्तरावरील विकास नियोजनाला नवी गती मिळाली आहे. आधुनिक तंत्रज्ञान, लोकसहभाग आणि शाश्वत जलव्यवस्थापन यांच्या संगमातून जलसमृद्ध महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने राज्याने उचललेले हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

"पाण्याचा प्रत्येक थेंब अमूल्य आहे; परंतु त्या प्रत्येक थेंबाचे शास्त्रशुद्ध नियोजन हीच खरी जलसुरक्षेची गुरुकिल्ली आहे." एखाद्या गावात नवी विहीर कोठे घ्यावी? पाणी कोणत्या दिशेने वाहते? डोंगराच्या उतारावर सलग समतल चर (Continuous Contour Trenches CCT) नेमके कुठे घ्यावेत? शेततळे, सिमेंट नाला बांध (CNB), गॅबियन किंवा इतर जलसंधारणाची कामे कोणत्या ठिकाणी सर्वाधिक परिणामकारक ठरतील? एखाद्या भागात भूजल पुनर्भरणाची क्षमता किती आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी पूर्वी अनेक दिवस क्षेत्र पाहणी, कागदी नकाशे, स्थानिक अनुभव आणि विविध विभागांकडील माहितीवर अवलंबून राहावे लागत असे.

आज मात्र ही परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. संगणकाच्या पडद्यावर किंवा मोबाईलच्या स्क्रीनवर एका क्लिकमध्ये संपूर्ण पाणलोट डोळ्यासमोर उभा राहतो. नदी-नाले, ओघोळ, जमिनीचा उतार, मातीचा प्रकार, गावांच्या सीमा, गट क्रमांक, भूजल पुनर्भरणाची क्षमता आणि जलसंधारणाच्या उपचारांची योग्य ठिकाणे यांची माहिती आता डिजिटल स्वरूपात उपलब्ध झाली आहे. या परिवर्तनामागे आहे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (WDC:PMKSY २.०) अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी उभारलेली आधुनिक भौगोलिक माहिती प्रणाली (GIS).

या उपक्रमाचे सर्वात मोठे यश केवळ GIS तंत्रज्ञानाचा वापर नव्हे, तर महाराष्ट्रातील ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट (Micro Watershed) नकाशे प्रथमच सर्वसामान्य नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध करून देणे, ही या उपक्रमाची ऐतिहासिक कामगिरी आहे. शासनाच्या तांत्रिक दालनात मर्यादित असलेली माहिती आज प्रत्येक शेतकरी, ग्रामपंचायत, विद्यार्थी, संशोधक आणि नागरिकापर्यंत पोहोचली आहे. ही केवळ डिजिटल सेवा नाही; तर जलसंधारणाच्या ज्ञानाचे लोकशाहीकरण आहे.

महाराष्ट्र हा भौगोलिकदृष्ट्या विविधतेने नटलेला प्रदेश आहे. कोकणातील मुसळधार पाऊस, विदर्भातील उष्ण हवामान, मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, पश्चिम महाराष्ट्रातील सिंचन व्यवस्था आणि सह्याद्रीच्या पर्वतरांगा..प्रत्येक भागाची जलस्थिती वेगळी आहे. परंतु या सर्व भागांना एकच समान आव्हान आहे, ते म्हणजे पावसाचे पाणी अधिकाधिक प्रमाणात जमिनीत मुरविणे आणि भविष्यासाठी साठवणे.

हवामान बदलामुळे पावसाचा कालावधी कमी होत आहे, तर अल्पावधीत अतिवृष्टीचे प्रमाण वाढत आहे. परिणामी मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जाते. त्याचबरोबर मृदा धूप वाढते, भूजल पातळी घटते आणि शेतीची उत्पादकता कमी होते. अशा परिस्थितीत प्रत्येक थेंबाचे नियोजन शास्त्रीय पद्धतीने करणे ही काळाची गरज बनली आहे. यासाठी केवळ जलसंधारणाची कामे करणे पुरेसे नसते; तर योग्य ठिकाणी, योग्य प्रकारचा आणि योग्य प्रमाणात उपचार करणे आवश्यक असते. हे काम अंदाजावर नव्हे, तर अचूक माहितीच्या आधारेच शक्य होते.

काही वर्षांपूर्वी पाणलोट विकासाचे नियोजन करताना प्रत्यक्ष क्षेत्र पाहणी, स्थानिक अनुभव आणि कागदी नकाशांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागत असे. प्रत्येक विभागाकडे वेगवेगळी माहिती असल्याने सर्व माहिती एकत्र करून सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report DPR) तयार करण्यासाठी मोठा कालावधी लागत असे. काही ठिकाणी एकाच प्रकारची कामे पुन्हा प्रस्तावित होत, तर काही भाग आवश्यक उपचारांपासून वंचित राहत असे.

आज GIS प्रणालीमुळे हे चित्र बदलले आहे. उपग्रह प्रतिमा, डिजिटल एलिव्हेशन मॉडेल, GPS आधारित सर्वेक्षण, मृदेची माहिती, पर्जन्यमान, भू-आकृती, जलप्रवाह, भूजल आणि इतर विविध माहितीचे स्तर (Layers) एकत्र करून त्यांचे वैज्ञानिक विश्लेषण केले जाते. परिणामी निर्णय प्रक्रियेला डेटा आणि विज्ञानाचा भक्कम आधार मिळाला आहे. याच कारणामुळे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना : पाणलोट विकास घटक २.० मध्ये GIS ला "Digital Brain" असे संबोधले जाते. कारण ही प्रणाली केवळ नकाशे तयार करत नाही; तर संपूर्ण पाणलोट विकासासाठी योग्य निर्णय घेण्यास मदत करते.

या संपूर्ण उपक्रमातील सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० अंतर्गत वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य यांनी राज्यातील ५७,८५८ सूक्ष्म पाणलोट नकाशे (Micro Watershed Maps) तयार करून ते विनामूल्य सार्वजनिक वापरासाठी यंत्रणेच्या VSINA या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले आहेत. ही केवळ आकड्यांची नोंद नाही; तर राज्याच्या नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनाचा डिजिटल पाया आहे.

आज कोणताही नागरिक आपल्या गावाचा सूक्ष्म पाणलोट नकाशा https://mhvslna.org/ या संकेतस्थळावर पाहू शकतो, डाउनलोड करू शकतो आणि त्याची प्रिंटही घेऊ शकतो. पूर्वी केवळ तज्ज्ञ आणि शासकीय यंत्रणांपुरती मर्यादित असलेली माहिती आता लोकांच्या हातात आली आहे. यामुळे शासनाची माहिती अधिक पारदर्शक झाली आहे, तसेच नागरिकांच्या सहभागालाही नवी दिशा मिळाली आहे. पाणलोट विकास हा केवळ सरकारी कार्यक्रम न राहता लोकसहभागातून उभा राहणारा विकासाचा पाया बनू लागला आहे. (साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# एआयला मातृत्व भावनेने प्रशिक्षण द्या; अन्यथा...

जगभरात वेगवेगळ्या क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर झपाट्याने वाढताना पाहायला मिळत आहे. एआयच्या




वाढत्या वापराबाबत अनेकांनी यापूर्वी चिंता व्यक्त केल्या आहेत, पण जेव्हा स्वतः एआयचे गॉडफादर मानला जाणारा व्यक्ती याबद्दल इशारा देतो, तेव्हा त्याची दखल घेणे आवश्यक ठरते. एक मोठे कंप्युटर शस्त्रज्ञ जेफ्री हिंटन यांनी भविष्यातील एआय चॅटबॉट्सना कशा प्रकारे प्रशिक्षित करणे आवश्यक आहे याबद्दल मत व्यक्त केले आहे. त्यांनी भविष्यातील प्रगत एआय प्रणाली मातृत्व भावनेसह डिझाइन केल्या गेल्या पाहिजेत असे सुचवले आहे.

लास वेगास येथील Ai४ परिषदेत बोलताना हिंटन यांनी नियंत्रण आणि दडपशाही याच्यामध्यमातून एआयवर वर्चस्व टिकवून ठेवण्याचे धोरण फेटाळून लावले. एआयची प्रगती ज्या वेगाने होत आहे ती पाहता ही रणनिती कुचकामी आहे असा युक्तीवाद त्यांनी केला. याच्या एवजी त्यांनी नवीन संकल्पना सादर केली, त्यांनी सुचवले की मानव-एआय संबंध हे आई आणि तिचे मुल यांच्या धर्तीवर असले पाहिजेत.

योग्य मॉडल आहे ज्याचे आपल्याकडे एकमेव उदाहरण आहे ज्यामध्ये एक कमी बुद्धिमान गोष्ट अधिक बुद्धिमान गोष्टीवर नियंत्रण ठेवते, ते म्हणजे आई जी तिच्या मुलाकडून नियंत्रित केली जाते. असे हिंटन म्हणाले, जर ते माझे पालनपोषण करणार नसेल, तर ते माझी जागा घेईल,असेही त्यांनी पुढे बोलताना सांगितले. यामध्ये संकल्पना अशी आहे की, जसे एक मूल ज्याची बुद्धिमत्ता मर्यादित आहे, ते त्याच्या अधिक बुद्धिमान आईकडून मार्गदर्शन आणि काळजी करवून घेऊ शकते, त्याचप्रमाणे मानवतेची काळजी एका अतिबुद्धिमान एआयकडून घेतली जाऊ शकते. मानवांसाठी तंत्रज्ञान सुरक्षित ठेवण्यासाठी हिंटन यांनी सुचवले की मानवतेने पूर्णपणे एआयला स्मार्ट बनवण्यावर लक्ष दिले पाहिजे याबरोबरच एआयला 'मातृत्वाची वृत्ती (रींशीपरश्र ळपीींळपलीं)' दिली पाहिजे, जेणेकरून ते खऱ्या अर्थाने आपल्याबद्दल, त्यांच्या मुलांची काळजी करेल, असेही ते म्हणाले. हिंटन यांनी युक्तीवाद केला की आपल्याला एआय असिस्टंट पेक्षा एआय मदर्सची गरज आहे. त्यांनी आधी दिलेल्या उदाहरणाचा संदर्भ देत हिंटन म्हणाले की एका असिस्टंटला तुम्ही कामावरून काढू शकता. सुदैवाने तुम्ही तुमच्या आईला कामावरून काढू शकत नाहीत.

# पार्श्वगायक मोहम्मद रफी



## निमित्त

मोहम्मद रफी यांचा जन्म २४ डिसेंबर १९२४ रोजी पंजाबमधील कोटला सुल्तान सिंह गावात झाला. एका मध्यमवर्गीय मुस्लिम कुटुंबात जन्मलेल्या या अवलियाने पुढे जाऊन भारतीय संगीत क्षेत्रात आपल्या सुरेल आवाजाने साऱ्यांनाच मोहात पाडले. लाहोरमध्ये उस्ताद वाहिद खान यांच्याकडून रफींनी संगीताचे धडे गिरवले.

त्यानंतर गुलाम अली खान यांच्याकडून भारतीय शास्त्रीय संगीताचं शिक्षण घेतलं. वयाच्या १३ व्या वर्षी रफींनी पहिल्यांदा जाहीर व्यासपीठावर गाणं गायलं आणि यावेळी प्रेक्षकांमध्ये बसलेल्या संगीतकार श्याम सुंदर यांना त्यांचं गाणं आवडलं. श्याम सुंदर यांनी रफींना मुंबईत बोलावलं.

यानंतर 'सोनिये नी हिरीये नी' हे पहिलं गाणं रफींनी 'गुल बलोच' या पंजाबी सिनेमासाठी गायलं. १९४४ साली नौशाद यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली 'हिन्दुस्तान के हम है पहले आप के लिए गाया' हे पहिलं हिंदी गाणं गायलं आणि नंतर असंख्य गाण्यांमधून आपल्या आवाजातली जादू त्यांनी दाखवून दिली.

घरात तशी संगीताची आवड नव्हती, परंतु मुलाचा संगीताकडे कल बघून, वडिलांनी किराणा घराण्याच्या वहीद खान, फिरोझ निझामी यांच्याकडे धाडला आणि त्यांच्याकडून महंमद रफींना संगीताची थोडीफार तालीम मिळाली. वरील दोन गुरूंपैकी, फिरोझ निझामी यांनी काही हिंदी चित्रपटांना – जुगनू सारख्या त्याकाळी लोकप्रिय झालेल्या चित्रपटाला संगीत देखील दिले होते आणि रफींची पुढील कारकीर्द बघता, या योगायोग अन्वर्थक ठरतो.सैगल हे त्यांचे आदर्श गायक होते आणि त्याकाळचा सैगल यांचा प्रभाव बघता, ते सुसंगतच होते.

प्रसिद्ध संगीतकार श्यामसुंदर यांनी रफींना १९४४ मध्ये आलेल्या गुल बलोच या चित्रपटात गायनाची संधी दिली. पुढे गांव की छोरी आणि बझार सारख्या चित्रपटात श्यामसुंदर यांनी आणखी संधी देऊन, चित्रपट सृष्टीत पाय रोवायला मदत केली. परंतु खऱ्या अर्थाने, प्रसिद्ध संगीतकार हुस्नलाल-भगतराम या जोडगोळीने मीना बझार या चित्रपटातील १२ गाण्यांपैकी १० गाणी गावयास दिली आणि रफी प्रकाशात आले. हे सगळे लिहिण्याचा उद्देश असा, त्यावेळी निरनिराळ्या प्रकृतीच्या रचनाकारांनी रफींना पसंती दिली होती.

रफींच्या अष्टपैलू गायनाला पुढेही वारंवार दाद मिळत गेली, त्याची ही नांदी असे सहजपणे म्हणता येईल. इथे एक बाब ध्यानात ठेवणे अत्यावश्यक ठरेल, हा सगळा काळ, नायक-गायकांचा होता आणि अर्थातच अशा वेळेस, केवळ गायक म्हणून स्थिरावण्यासाठी बरीच धडपड करणे क्रमप्राप्तच होते. चित्रपट संगीतात साकार सादर करण्याचा पार्श्वगायन हा प्रमुख मार्ग म्हणून निश्चित होईपर्यंत असेच चाललेले असे.

हिंदी सिनेसृष्टीतील गायकांपैकी सर्वश्रेष्ठ गायकांच्या यादीत मोहम्मद रफींचं नाव घेतलं जातं. संगीत क्षेत्रातील अनेक पुरस्कारांनीही त्यांचा गौरव झाला. या पुरस्कारांपेक्षा त्यांना अपेक्षित असलेला रसिकवर्ग त्यांना मोठ्या संख्येने लाभला. ३१ जुलै १९८० रोजी आवाजाच्या जादूगाराचं हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं, मात्र आवाजाच्या रुपातून रफी आजही रसिकांच्या मनात जिवंत आहेत. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# अल्कलाईन डाएटमुळे खरंच संधिवातावर आराम मिळतो?

इन्स्टाग्रामवर एका कंटेंन्ट क्रिएटरने एक व्हिडीओ पोस्ट केला होता; ज्यात म्हटले आहे की, संधिवातावर अल्कधर्मी आहार घ्या. भरपूर क्षारीय पदार्थ खा, हळदीचे सेवन सुरू करा. या संदर्भात नवी दिल्लीतील इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटल्सचे ऑर्थोपेडिक्स आणि जॉइंट रिप्लेसमेंटचे वरिष्ठ सल्लागार डॉ. प्रा.राजू वैश्य म्हणाले की, अल्कधर्मी पदार्थांचे सेवन केल्याने शरीराची पीएच स्थिती संतुलित राखण्यास मदत होते.



डॉ. वैश्य यांनी दावा केला की, अल्कधर्मी आहार शरीरातील अतिरिक्त ॲसिड कमी करते आणि जळजळ कमी करण्यासह निरोगी राहण्यास मदत करते.

अल्कधर्मी आहार संधिवात बरे करू शकतो का?

डॉ. वैश्य सांगतात की, अल्कधर्मी आहार संधिवाताची लक्षणे बरे किंवा कमी करू शकतो. पण, या दाव्याचे समर्थन करण्यासाठी मर्यादित वैज्ञानिक पुरावे आहेत. काही समर्थकांनी असा युक्तिवाद केला की, अल्कधर्मी आहारामुळे जळजळ आणि सांधेदुखी कमी होऊ शकते, आहारातील आम्लाचा भार आणि संधिवात यांच्यातील संबंध वैज्ञानिकदृष्ट्या व्यवस्थितपणे स्थापित केले गेलेले नाहीत.

बहुतेक तज्ज्ञ असे सुचवतात की, केवळ अल्कधर्मी आहारामुळे संधिवाताची लक्षणे कमी करता येत नाहीत. त्यासाठी जीवनशैलीतील बदल, औषधे आणि थेरपीची गरज असते. डॉ. वैश्य यांनी अनेक नवीन उपचारपद्धतींची माहिती दिली; ज्या सांधेदुखीच्या उपचारांसाठी वापरल्या जातात. त्यात स्टेम सेल थेरपी, जीन थेरपी व बायोलॉजिकल ट्रीटमेंटचा वापर केला जातो.

स्टेम सेल थेरपीमध्ये सांध्यातील वेदना आणि जळजळ कमी करण्यासाठी स्टेम पेशी इंजेक्टचा वापर केला जातो. जीन थेरपीमध्येही जळजळ रोखली जाते. डॉ. वैश्य म्हणाले की, सांधेदुखीच्या उपचारांबद्दल काही सामान्य गैरसमज आहेत; जसे की, सांधेदुखी हा वृद्धत्वामुळे होणारा आजार आहे. त्यामुळे सांध्यांचे आणखी नुकसान टाळण्यासाठी व्यायाम टाळला पाहिजे आणि केवळ आहारातील बदल संधिवात बरे करू शकतात.

हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की, संधिवात ही एक जटिल आरोग्य स्थिती आहे. त्यावर प्रभावी व्यवस्थापनासाठी औषधे, शारीरिक उपचार, जीवनशैलीतील बदल आणि काही वेळा शस्त्रक्रियेची गरज भासू शकते, असेही डॉ. वैश्य यांनी स्पष्ट केले.

# 'प्रसारमाध्यमांना माहिती देण्यास अधिकाऱ्यांना बंदी घातलेली नाही'

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेने (राजिप) प्रसारमध्यमांना माहिती देण्यासाठी पदाधिकारी व अधिकारी यांना कोणत्याही प्रकारचे बंधन घातलेले नाही. माझ्या पत्रामंध्ये अनवधनाने एक शब्द चुकीचा वापरला गेला. त्यामुळे गैरसामज झाला. राजिपतर्फे महिती देण्यासाठी पाच जणांची नियकुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती राजिपचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी दिली.

राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी गुरूवारी (दि. ३०) पत्रकार परिषद घेऊन ही महिती दिली. जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे यावेळी उपस्थित होत्या.



राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी २५ जून २०२६ रोजी राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र पाठवून राजिपचे पदाधिकारी व अधिकारी यांनी अध्यक्षांची परवानगरी घेऊनच प्रसारमध्यमांना महिती द्यावी असे आदेश काढले होते. त्यामुळे पत्रकारांना महिती मिळत नव्हती. त्यामुळे गैरसमज निर्माण झाले होते. गुरूवारी सकाळी राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी पत्रकार परिषद घेऊन आदेशाबद्दची भूमिका स्पष्ट केली.

पत्रकारांना महिती देण्यास कोणत्याही बंदी घालणे हा या पत्राचा हेतू नव्हता. पत्रकारांना महिती देण्यास अधिकाऱ्यास बंदी घालण्यात आलेली नाही. पत्रकारांना आवश्यक असलेली माहिती अधिकाऱ्यांनी देऊनये असे आम्ही सांगितलेले नाही. पत्रकारांना हवी असलेली माहिती संबंधीत अधिकारी देतील. अधिकारी महिती देत नसतील तर मी स्वतः महिती देईल, असे राजिप अध्यक्षंनी स्पष्ट केले.

राजिपचे प्रशासन अधिकाधिक पारदर्श व्हावे यासाठी राजिपतर्फे अधिकृत माहिती प्रसृत करणे, माध्यमांशी संवाद साधणे बाबींसाठी पाच जणांची नियुक्ती करण्यात आली आहे. माहिती देण्यासाठी राजिप उपाध्यक्ष मधुकर पाटील ९८९००२४५५५, राजिप शिक्षण व अर्थ समिती सभापती चंद्रकांत कळंबे ९०२२१४९६६९, राजिप कृषि व पशुसंवर्धन समिती सभापती वैकुंठ पाटील ८३९००९९९९९, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे ९०११०४६०७९, राजिप उप मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे ९८६०२९८५७४ यांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती राजिप अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी दिली.

> **रायगड जिल्हा परिषदेत भाजपा, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या तीन पक्षांच्या महायुतीची सत्ता आहे. आमच्यामध्ये विसंवाद नाही. आम्ही एकमताने सर्व निर्णय घेतो.**
>
> **–मंगेश वाकडीकर, अध्यक्ष, राजिप**

## पेणमध्ये ऑनलाईन फसवणुकीप्रकरणी दोघांवर गुन्हे

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यात काही दिवसांपूर्वी आरोपी यश गायकवाड व इब्राहिम शहा या दोघांनी अशिक्षित नागरिकांचा गैरफायदा घेत त्यांच्या नावाने बँकेत खाते ओपन करून त्याद्वारे पैसे खात्यावर येत असल्याबाबतची तक्रार पोलिसांकडे आली असता सायबर फसवणूक प्रकरणी पेण पोलिसांनी दोघांवर गुन्हे दाखल केले आहेत.

आरोपी यश पांडुरंग गायकवाड, रा. देवआळी, पेण व इब्राहिम बशीर शहा, रा. पाली–सुधागड या दोघांनी संगनमत करून काही अशिक्षित असणाऱ्या नागरिकांच्या भोळेपणाचा फायदा घेत सायबर फ्रॉडची रक्कम प्राप्त करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडीयात खाते उघडुन त्यामध्ये २०२५ ते २०२६ या कालावधीत मोठ्या प्रमाणात सायबर फसवणुकीची रक्कम प्राप्त केली व ती रक्कम इतर बँक खात्यावर हस्तांतरीत करण्यासाठी जाणीवपूर्वक सहाय्य करीत असल्याची तक्रार पोलिसांकडे आली होती.

## खुशबू ठाकरे मृत्यूप्रकरणी वैद्यकीय अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल

**पेण : प्रतिनिधी**

कुष्ठरोगावरील उपचारादरम्यान झालेल्या निष्काळजीपणामुळे नऊ वर्षीय खुशबू ठाकरे हिचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणात अखेर कामार्ली प्राथमिक आरोग्य केंद्रातील तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ. ममता गजबे यांच्याविरुद्ध पेण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे मृत मुलीच्या कुटुंबीयांना न्याय मिळण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाल्याची भावना व्यक्त होत आहे. पेण तालुक्यातील तांबडी येथील खुशबू ठाकरे हिच्यावर कुष्ठरोगावर उपचार सुरू असताना आवश्यक वैद्यकीय दक्षता न घेता आणि प्रचलित वैद्यकीय मानकांचे पालन न करता उपचार केल्याचा आरोप आहे. या निष्काळजीपणामुळे तिची प्रकृती गंभीर बनली आणि २२ जानेवारी रोजी तिचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर पेण तालुक्यासह रायगड जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली होती. या प्रकरणी सामाजिक कार्यकर्त्यांकडून पाठपुरावा करण्यात येत होता.

## मेलजोल आणि महानगर गॅस लि.च्या विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी नेतृत्व व क्षमता विकास प्रशिक्षण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मेलजोल संस्थेतर्फे महानगर गॅस लिमिटेड (MGL) यांच्या सहकार्याने "किशोरवयीन विद्यार्थी नेतृत्व व क्षमता विकास प्रशिक्षण कार्यक्रम २०२५–२६" चे आयोजन आर. व्ही. फार्महाऊस, नीवी, ता. रोहा येथे करण्यात आले होते . या दिवसभराच्या प्रशिक्षणामध्ये विविध शाळांतील निवडक किशोरवयीन मुलांचा क्लब तथा बचत बँक विद्यार्थी नेते आणि नेतृत्व क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



या प्रशिक्षणाचे प्रमुख प्रशिक्षक म्हणून कृष्णा झुगारे (प्रादेशिक व्यवस्थापक, रायगड व वरिष्ठ प्रशिक्षक, मेलजोल) यांनी विद्यार्थ्यांना नेतृत्व, संघभावना, प्रभावी संवाद, निर्णयक्षमता, नियोजन, समस्या निराकरण, आर्थिक साक्षरता आणि सामाजिक जबाबदारी या विषयांवर संवादात्मक व कृतीप्रधान पद्धतीने मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षणामध्ये रोहा नगरपरिषद शाळा क्रमांक १, ९ व १०, आर. जी. पोटफोडे (मास्तर) विद्यालय, खांब तसेच शासकीय आश्रमशाळा, सानेगाव येथील ५१ किशोरवयीन मुलांचा क्लब तथा बचत बँक विद्यार्थी नेते तसेच नेतृत्व क्षमता असलेले ५ विद्यार्थी, असे एकूण ५६ विद्यार्थी सहभागी झाले. विद्यार्थ्यांसोबत संबंधित शाळांतील शिक्षक व प्रतिनिधी देखील उपस्थित होते.

यामध्ये विविध ऊर्जावर्धक उपक्रम, नेतृत्व विकास खेळ, गटचर्चा, किशोरवयीन मुलांचा क्लब तथा बचत बँक यांचे कार्य अधिक प्रभावी करण्याबाबत मार्गदर्शन, शाळांमधील अडचणींचे विश्लेषण, त्यावरील उपाययोजना, वार्षिक उद्दिष्टे निश्चित करणे, कृती आराखडा तयार करणे, गट सादरीकरण आणि चिंतनपर सत्रांचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेतील क्लब व बचत बँक अधिक सक्षमपणे कार्यरत ठेवण्यासाठी पुढील वर्षाचा कृती आराखडा सादर केला.

## अलिबागमध्ये भारतीय तटरक्षक दलाचा जनजागृती उपक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय तटरक्षक दलाने अलिबाग येथे आयोजित केलेल्या सामुदायिक जनजागृती कार्यक्रमातून किनारी सुरक्षा अधिक मजबूत करण्याबरोबरच मच्छीमारांच्या आरोग्य संवर्धनाचा संदेश दिला. सागरी सुरक्षा, आपत्कालीन परिस्थितीतील बचावकार्य आणि मच्छीमारांच्या सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करणाऱ्या या कार्यक्रमात अलिबाग व परिसरातील सुमारे १८० मच्छीमारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाला रायगडच्या पोलीस अधीक्षक आँचल दलाल, मत्स्यव्यवसाय उपायुक्त नागनाथ भादुले, मच्छीमार समाजाचे प्रमुख तसेच विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या उपक्रमामुळे भारतीय तटरक्षक दल, पोलीस, मत्स्य विभाग आणि मच्छीमार समाज यांच्यातील समन्वय अधिक दृढ करण्यावर भर देण्यात आला.

यावेळी भारतीय तटरक्षक दलाच्या अधिकाऱ्यांनी लाइफ जॅकेट, लाइफबॉय आणि डिस्ट्रेस अलर्ट ट्रान्समीटर यांचा योग्य वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिक




सादर केले. समुद्रात कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्वरित मदतीसाठी २४ तास कार्यरत शोध व बचाव हेल्पलाइन १५५४ चा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच समुद्रातील संशयास्पद हालचालींबाबत तात्काळ माहिती देणे, वैध ओळखपत्र जवळ बाळगणे आणि मासेमारी नौकांसाठी निश्चित करण्यात आलेल्या रंगसंहितेचे पालन करणे, या बाबींचे महत्त्वही मच्छीमारांना पटवून देण्यात आले.

यावेळी आयोजित करण्यात आलेल्या वैद्यकीय व आरोग्य जनजागृती शिबिर. या शिबिरात क्षयरोग प्रतिबंध, योगाचे महत्त्व, उत्तम आरोग्य, रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्याचे उपाय याविषयी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. याशिवाय सीपीआर (हृदय–फुफ्फुस पुनर्जीवन), प्रथमोपचार आणि फ्रॅक्चर स्थिरीकरण यांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देऊन आपत्कालीन परिस्थितीत जीव वाचविण्यासाठी आवश्यक कौशल्यांची माहिती मच्छीमारांना देण्यात आली.

या उपक्रमाला मच्छीमार समाजाने उत्स्फूर्त प्रतिसाद देत भारतीय तटरक्षक दलाच्या या प्रयत्नांचे स्वागत केले. सागरी जीविताचे संरक्षण, किनारी सुरक्षा अधिक सक्षम करणे आणि मच्छीमारांच्या सर्वांगीण कल्याणासाठी भारतीय तटरक्षक दल सातत्याने कटिबद्ध असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

## सुपेगाव रस्त्याचा प्रश्न मार्गी; कामात दिरंगाई झाल्यास ठेकेदारावर कारवाई

**धाटाव : प्रतिनिधी**

गेल्या तीन आठवड्यांपासून सुपेगाव मार्ग बंद असल्याने नागरिक, विद्यार्थी, शेतकरी, कामगार आणि व्यावसायिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. अखेर सार्वजनिक बांधकाम विभागाने युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू केले असून, ठेकेदाराने काम वेळेत पूर्ण केल्यास येत्या सोमवारपासून हा मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार असल्याची माहिती अतिरिक्त सार्वजनिक बांधकाम विभागाचे अतिरिक्त कारभार सांभाळणारे उपअभियंता अरुण पाटील यांनी दिली आहे.

५ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे मुरुड–रोहा–कोलाड प्रमुख मार्गावरील उसरोली फाटा ते तळेखार फाटा (कि.मी. ९ ते ११) या दरम्यान रस्त्याचा मोठा भाग खचला होता. त्यामुळे २० जुलैपासून हा मार्ग सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला होता. रस्ता बंद असल्याने



नागरिकांना मोठा वळसा घालून प्रवास करावा लागत असून, रोजच्या कामकाजावर त्याचा गंभीर परिणाम झाला आहे.

सध्या क्षतिग्रस्त भागाचे खोदकाम, मजबुतीकरण आणि तात्पुरती दुरुस्ती अंतिम टप्प्यात असून, काम पूर्ण होताच रस्ता खुला करण्यात येणार आहे. नागरिकांनीही काम पूर्ण होईपर्यंत संयम बाळगावा.ठरलेल्या मुदतीत काम पूर्ण न केल्यास संबंधित ठेकेदारावर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही अधिकारी पाटील यांनी दिला आहे.

## रायगड मनसेचे माजी जिल्हा उपाध्यक्ष संदीप ठाकूर कार्यकर्त्यांसह शिंदे शिवसेनेत

**पाली : प्रतिनिधी**

रायगडच्या पेण विभागातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला मोठा राजकीय धक्का देत मनसेचे माजी जिल्हा उपाध्यक्ष संदीप ठाकूर यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह शिंदे शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. आमदार महेंद्र दळवी आणि जिल्हाध्यक्ष राजाभाई केणी, यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात ठाकूर व त्यांच्या सहकाऱ्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

आमदार महेंद्र दळवी यांनी संदीप ठाकूर व सर्व प्रवेशकर्त्यांचे स्वागत करुन त्यांना पक्षात योग्य तो मान सन्मान दिला जाईल अशी ग्वाही देत या पक्ष प्रवेशाने शिवसेनेला मोठी बळकटी मिळणार असल्याचे स्पष्ट केले. प्रवेशकर्त्यात माजी पेण तालुकाध्यक्ष गौरी ओरा,उपतालुकाध्यक्ष नितेश पाटील,पंकज पाटील,सौरभ पाटील, विभाग अध्यक्ष अजिंक्य गावंड, विशाल ठाकूर, कल्पेश सकपाळ,सुहास पवार,नयन रोडेकर,आदित्य पाटील,अप शहराध्यक्षा नित्या रोडेकर यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जाहीर प्रवेश केला. यावेळी माजी पेण तालुका अध्यक्ष तुषार मान कवळे, नगरसेवक भूषण कडू उपस्थित होते.



## पेण तालुक्यात आरोग्य केंद्रांना मिळणार नवी उभारी; जि.प. सभापती वैकुंठ पाटील यांच्या पाठपुराव्याला यश



**पेण : प्रतिनिधी**

गडब, कळवे – जोहे आरोग्य केंद्रांना नव्याने उभारी मिळणार असून याकामी जि. प. सभापती वैकुंठ पाटील यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. कळवे – जोहे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी १.५ कोटी रुपयांच्या निधीची प्रशासकीय मान्यता मिळाली असून गडब प्राथमिक आरोग्यकेंद्राच्या नूतनीकरणासाठी जेएसडब्ल्यूच्या माध्यमातून सुमारे ३.५ कोटी कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजूर झाला आहे. या निधीतून गडब येथे सुसज्ज आरोग्य केंद्राची इमारत उभारण्यात येणार आहे.

वडखळ येथील कार्यक्रमाप्रसंगी पत्रकारांशी बोलताना जि. प. सभापती वैकुंठ पाटील यांनी सांगितले कि, या कामामुळे ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम होऊन नागरिकांना मोठ्या शहरांकडे उपचारासाठी जाण्याची गरज कमी भासणार आहे. या विकास कामामुळे ग्रामीण भागातील आरोग्यसेवा अधिक सक्षम होणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.


## कागदपत्रे हरवल्या बाबत जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसिने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल श्री. गिरिश जगदीश कासट, रा. ७५६, कापड बाजार, टिळक रोड, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड यांच्या मालकीचे असलेले आदई, आकुर्ली, नेवाळी या गावातील आम्ही खरेदी केलेल्या मिळकतीचे मुळ खरेदीखत, चुकदुरुस्ती पत्र व कन्व्हेन्स डीड, बक्षिसपत्र, भागिदारी करार, वाटणीपत्र चे मुळ कागदपत्र असे २० खालील वर्णन केलेले दस्त पनवेल या परीसरामधुन गहाळ झालेले आहेत, गहाळ झालेल्या दस्ताचे वर्णन पुढील प्रमाणे.

**हरवलेल्या/गहाळ झालेल्या मूळ कागदपत्रांची यादी खालीलप्रमाणे आहेः**

१. गट क्र. ५२ च्या जमिनीच्या संदर्भात, गोपीनाथ आणि किरीट जे भयानी, यशवंत दशरथ हुदार, मेघा यशवंत हुदार, रवींद्र गणपत जोशी आणि मनोज प्रितमलाल वोरा यांच्या कायदेशीर वारसांमध्ये निष्पादित केलेले आणि अनुक्रमांक PVL-३/४४७१/२०१२ अन्वये रीतसर नोंदणीकृत असलेले दिनांक २७ एप्रिल २०१२ चे खरेदीखत.

२. गट क्र. ५३ च्या जमिनीच्या संदर्भात, गोपीनाथ विठू म्हस्कर, राजाराम गोपाळ म्हस्कर आणि विजय त्रिंबक गणपुले यांच्यात निष्पादित केलेले आणि अनुक्रमांक ४४७ अन्वये रीतसर नोंदणीकृत असलेले दिनांक २७ जुलै १९९५ चे खरेदीखत.

३. गट क्र. ५३ च्या जमिनीच्या संदर्भात, वेणूबाई परशुराम म्हात्रे, रामाबाई महादेव ठाकूर, राधाबाई पोश्या म्हात्रे आणि कृष्णा अनंत भगत आणि तुकाराम राजाराम म्हस्कर आणि सखाराम राजाराम म्हास्कर यांच्यात निष्पादित केलेले आणि अनुक्रमांक PVL/६३४१/२००४ अन्वये रीतसर नोंदणीकृत असलेले दिनांक ३१ ऑगस्ट २००४ चे बिनमोबदला हक्कसोड पत्र (Release Deed).

४. गट क्र.५३ च्या जमिनीच्या संदर्भात, विजय त्रिंबक गणपुले आणि दशरथ पाडू हद्दार आणि किरीट जमनादास भयानी यांच्यात निष्पादित केलेले आणि अनुक्रमांक PVL/२६४४/२००८ अन्वये रीतसर नोंदणीकृत असलेले दिनांक १८ मार्च २००८ चे खरेदीखत.

५. गट क्र. १६/१ च्या जमिनीच्या संदर्भात, श्रावण रामजी शेळके आणि यतीन हरिराम रुपारेल यांच्यात निष्पादित केलेले आणि अनुक्रमांक PVL/२३५/१९८४ अन्वये रीतसर नोंदणीकृत असलेले दिनांक २७ जून १९८४ चे खरेदीखत.

६. गट क्र.१६/२ च्या जमिनीच्या संदर्भात, नामदेव चांगू काकडे आणि यतीन हरिराम रुपारेल यांच्यात निष्पादित केलेले आणि अनुक्रमांक १४८३ अन्वये रीतसर नोंदणीकृत असलेले दिनांक २ मे १९९१ चे खरेदीखत.

७. गट क्र.४२/१/अ च्या जमिनीच्या संदर्भात, गोमू धुड्या शेळके आणि विशाल रामकृष्ण दत्त यांच्यात निष्पादित केलेले आणि अनुक्रमांक PVL–३/९९५५/२००६ अन्वये रीतसर नोंदणीकृत असलेले दिनांक २८ डिसेंबर २००६ चे खरेदीखत.

८. गट क्र.४२/१/अ च्या जमिनीच्या संदर्भात, विशाल रामकृष्ण दत्त (त्यांचे मुखत्यार विपुल विशाल दत्त यांच्यामार्फत)आणि जगदीश राजकुमार बन्सल यांच्यात निष्पादित केलेले आणि अनुक्रमांक PVL-३/९७८०/२००७ अन्वये रीतसर नोंदणीकृत असलेले दिनांक ६ ऑक्टोबर २००७ चे खरेदीखत.

९. गट क्र.४२/१/अ च्या जमिनीच्या संदर्भात, जगदीश राजकुमार बन्सल (त्यांचे मुखत्यार कुलमुखत्यार हंसराज यादव यांच्यामार्फत) आणि विपुल विशाल दत्त यांच्यात निष्पादित केलेले आणि अनुक्रमांक PVL–३/७०८२/२०११ अन्वये रीतसर नोंदणीकृत असलेले दिनांक १२ जुलै २०११ चे खरेदीखत.

१०. गट क्र. १९/१० च्या जमिनीच्या संदर्भात, प्रभाकर नारायण देवधर आणि गोपाळ नारायण देवधर यांच्यात निष्पादित केलेले दिनांक २८ नोव्हेंबर, १९५५ चे वाटणीपत्र (Partition Deed).

११. गट क्र. १९/१० च्या जमिनीच्या संदर्भात, मारुती मुळ्या गोसावी आणि यतीन हरिराम रुपारेल यांच्यात निष्पादित केलेले आणि अनुक्रमांक PVL/४०६५/१९९५ अन्वये रीतसर नोंदणीकृत असलेले दिनांक २४ नोव्हेंबर १९९५ चे खरेदीखत.

१२. गट क्र. ३९/५/अ च्या जमिनीच्या संदर्भात, सीताराम वळकू शेळके आणि धर्मा शंकर शेळके यांच्यात निष्पादित केलेले आणि अनुक्रमांक ४१२ अन्वये रीतसर नोंदणीकृत असलेले दिनांक ६ जून १९५१ चे खरेदीखत.

१३. गट क्र.३९/५/अ च्या जमिनीच्या संदर्भात, धर्मा शंकर, नरेश धर्मा शेळके आणि आकाश सदानंद शेळके यांच्यात निष्पादित केलेले आणि अनुक्रमांक PVL/३१७८/२०१३ अन्वये रीतसर नोंदणीकृत असलेले दिनांक २१ मार्च २०१३ चे बक्षीसपत्र (Gift Deed).

१४. गट क्र. २२/२२/२३/२ च्या जमिनीच्या संदर्भात, राजाराम लिकड्या पाटील, हौसाबाई राजाराम पाटील, शांताराम राजाराम पाटील, सुरेश राजाराम पाटील आणि ज्ञानदेव राजाराम पाटील यांनी मुकेश करसनदास पलेजा यांच्या बाजूने निष्पादित केलेले आणि अनुक्रमांक २६१५/१९९० अन्वये रीतसर नोंदणीकृत असलेले दिनांक १२ ऑक्टोबर १९९० चे खरेदीखत.

१५. गट क्र. २२/४३/ब च्या जमिनीच्या संदर्भात, राध्या कान पाटील आणि रामदास कान पाटील यांनी वासुदेव शिवराम पाटील यांच्या बाजूने निष्पादित केलेले आणि २२ फेब्रुवारी १९६६ रोजी अनुक्रमांक १९६६ चा २५० अन्वये रीतसर नोंदणीकृत केलेले दिनांक २१ फेब्रुवारी १९६६ चे खरेदीखत.

१६. गट क्र. २२/४३/ब च्या जमिनीच्या संदर्भात, वासुदेव शिवराम पाटील आणि रेखा रवींद्र पाथकर आणि शकुंतला हरिचंद्र देसाई यांच्यात निष्पादित केलेले आणि अनुक्रमांक १९९५ चा १६१० अन्वये रीतसर नोंदणीकृत असलेले दिनांक ९ नोव्हेंबर १९९५ चे खरेदीखत.

१७. गट क्र. २२/४३/ब च्या जमिनीच्या संदर्भात, वासुदेव शिवराम पाटील आणि रेखा रवींद्र पाथकर आणि शकुंतला हरिचंद्र देसाई यांच्यात निष्पादित केलेले आणि अनुक्रमांक १९९६ चा ४४५९ अन्वये रीतसर नोंदणीकृत केलेले दिनांक ५ डिसेंबर १९९६ चे चूक दुरुस्ती खत (Deed of Rectification).

१८. गट क्र.२२/४३/ब च्या जमिनीच्या संदर्भात, रेखा रवींद्र पाथकर आणि विशाल रामकृष्ण दत्त यांच्यात निष्पादित केलेले आणि अनुक्रमांक PVL-३/३६३९/२००५ अन्वये रीतसर नोंदणीकृत असलेले दिनांक १८ ऑक्टोबर २००५ चे खरेदीखत.

१९. गट क्र. २२/४३/ब च्या जमिनीच्या संदर्भात, विशाल रामकृष्ण दत्त आणि जगदीशचंद्र राजकुमार बन्सल यांच्यात निष्पादित केलेले आणि अनुक्रमांक PVL–३/९७६२/२००७ अन्वये रीतसर नोंदणीकृत असलेले दिनांक ६ ऑक्टोबर २००७ चे खरेदीखत.

२०. गट क्र. २२/४३/ब च्या जमिनीच्या संदर्भात, जगदीशचंद्र राजकुमार बन्सल आणि उषा विशाल दत्त यांच्यात निष्पादित केलेले आणि अनुक्रमांक ७०८१/२०११ अन्वये रीतसर नोंदणीकृत केलेले दिनांक १२ जुलै २०११ चे खरेदीखत.

वर वर्णन केलेल्या गहाळ कागदपत्रांबाबत पनवेल शहर पोलीस ठाणे यांच्याकडे कागदपत्र मिसिंग ची तक्रार दि. २८/०७/२०२६ रोजी दाखल करण्यात आलेली आहे, त्या तक्रारींच्या अनुषंगाने त्यांचेकडिल हरवलेल्या मालमत्तेचा वरिल यादी प्रमाणे अनु. क्र. १४७७/२०२६, १४७८/२०२६, १४७९/२०२६, १४८०/२०२६, १४८१/२०२६, १४८२/२०२६, १४८३/२०२६, १४८४/२०२६, १४८५/२०२६, १४८६/२०२६, १४८७/२०२६, १४८८/२०२६, १४८९/२०२६, १४९०/२०२६, १४९२/२०२६, १४९३/२०२६, १४९४/२०२६, १४९५/२०२६, १४९६/२०२६, १४९७/२०२६ असे नंबर/ दाखले देण्यात आलेले आहे.

तरी आमच्या अशिलांचे मालकीचे वर वर्णन केलेले मुळ कागदपत्रे कोणासही कुठेही सापडल्यास अथवा मिळाले असल्यास खालील नमुद पत्यावर पोच करण्यात यावे, ही नोटिस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसात खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी अथवा रजिस्टर पोस्टाने मुळ कागदपत्रे पाठविण्यात यावे अगर समक्ष येवुन भेटावे याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल

दिनांक : ३१/०७/२०२६

सही/–

**ॲड.धनराज काशिनाथ केणी**

बी.ए.सी.,एल.एल.बी.

कार्यालयीन पत्ता : पुष्कर को.ऑप.हौसि.सोसायटी, फ्लॅट नं.०२, प्लॉट नं. ५८/१, प्रांत ऑफीस जवळ, जुना ठाणा नाका रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड.मोबाईल : ९७०२४३९७८७



# आर्थिक जाळे तोडल्याशिवाय दहशतवाद संपवणे अशक्य!




**स्मिता प्रकाश :** तुम्ही वारंवार डुमरियागंज प्रकरणाचा उल्लेख करता, त्याबद्दल काय सांगाल?

**आर.व्ही.एस. मणी :** डुमरियागंजमधील बनावट नोटांचे प्रकरण अत्यंत महत्त्वाचे होते. त्या काळात गृहसचिव मधुकर गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली बनावट नोटांविरुद्ध मोठी मोहीम सुरू करण्यात आली होती. माझ्या मते ते अत्यंत सक्षम गृहसचिव होते, परंतु त्यांच्या कार्यकाळातच अनेक मोठी सुरक्षा आव्हाने समोर आली. त्यांनी बनावट भारतीय चलन रोखण्यासाठी व्यापक मोहीम सुरू केली. त्या काळात बनावट नोटा नेपाळमार्गे, श्रीलंकेमार्गे आणि समुद्रीमार्गाने भारतात आणल्या जात असल्याची माहिती आमच्याकडे होती. आम्ही विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर बनावट नोटा जप्त केल्या. त्या काळातील आमच्या अंदाजानुसार भारतातील दहशतवादी कारवायांच्या निधीपैकी सुमारे २५ ते ३० टक्के निधी बनावट नोटांमधून येत होता, तर आणखी ३० टक्के निधी अमली पदार्थांच्या तस्करीतून मिळत होता. म्हणजे दहशतवादाच्या आर्थिक पुरवठ्यात या दोन्ही गोष्टींचा मोठा वाटा होता. बँकेतील चलन विभागाच्या रिझर्व्ह मुख्य महाव्यवस्थापकांबरोबर आम्ही नियमित समन्वय साधत होतो. मी जवळजवळ प्रत्येक महिन्यात मुंबईला येत असे. जप्त केलेल्या बनावट नोटांचे नमुने रिझर्व्ह बँकेकडे सुपूर्द करत असे. त्याआधारे पुढील तपास, तांत्रिक विश्लेषण आणि फौजदारी कारवाई केली जात असे. मुंबईमध्येही अशा अनेक प्रकरणांमध्ये मी सरकारी साक्षीदार म्हणून न्यायालयात साक्ष दिली आहे. त्या खटल्यात माझी उलटतपासणी करणारे वकील तेच होते, जे देशातील अनेक मोठ्या दहशतवादविरोधी खटल्यांमध्ये आरोपींची बाजू मांडत असत.

**स्मिता प्रकाश :** या बनावट नोटांचा सर्वांत मोठा लाभार्थी कोण होता?

**आर. व्ही. एस. मणी :** थेट लाभार्थी पाकिस्तानच होता. त्या काळात पाकिस्तानमध्ये भारतीय चलनाच्या बनावट नोटा मोठ्या प्रमाणावर छापल्या जात होत्या. एक १०० रुपयांची बनावट नोट छापण्यासाठी त्यांचा खर्च सुमारे ४३ रुपये येत असे. उर्वरित रक्कम हा त्यांचा निव्वळ नफा असे. जावेद खनानी हा पाकिस्तानमधील सर्वांत मोठ्या बनावट भारतीय चलन नेटवर्कचा प्रमुख होता. त्याची छपाई व्यवस्था कराची आणि पेशावर परिसरात कार्यरत होती. त्याचा जुळा भाऊ अफताब खनानी याला अमेरिकन डॉलरच्या बनावट नोटा छापण्याच्या आरोपाखाली ऑस्ट्रेलियात अटक झाली होती. 'नोटाबंदी'नंतर अवघ्या चार आठवड्यांत जावेद खनानीचा संशयास्पद मृत्यू झाला. नोटाबंदीनंतर भारतात पाठवण्यासाठी तयार ठेवलेला प्रचंड साठा एका रात्रीत निरुपयोगी झाला. तो संपूर्ण माल कागदाचा ढीग बनला. अशा परिस्थितीत त्या नेटवर्कमध्ये मोठे आर्थिक नुकसान झाले. आरिफ कसमानीच्या प्रकरणात जसे झाले होते, त्याप्रमाणेच येथेही पैसे, व्यवहार आणि अंतर्गत वाद निर्माण झाले असावेत. 'धुरंधर' चित्रपटात दाखवलेला भाग हा संपूर्ण चित्राचा केवळ एक छोटासा भाग आहे. प्रत्यक्षात या विषयावर भारत सरकारकडे अत्यंत सविस्तर अहवाल उपलब्ध होते. त्या काळात 'शीलादित्य बॅनर्जी समिती'ने भारतीय चलन अधिक सुरक्षित कसे करता येईल याबाबत विस्तृत शिफारसी केल्या होत्या, परंतु त्या शिफारसींकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्या उपाययोजना वेळेवर राबवल्या असत्या, तर बनावट नोटांचे हे जाळे इतके मोठे झाले नसते.




**स्मिता प्रकाश :** तुमच्या मते काही भारतीय राजकारण्यांनाही या नेटवर्कचा फायदा होत होता?

**आर.व्ही.एस. मणी :** होय, अनेक ठिकाणी पेट्रोल पंपांचा वापर बनावट नोटा चलनात आणण्यासाठी केला जात होता. काही पेट्रोल पंप हे प्रभावशाली राजकीय व्यक्तींशी संबंधित असल्याची माहिती तपासात समोर आली होती. प्रथम खऱ्या नोटा बँकेत जमा केल्या जात आणि त्याऐवजी बनावट नोटा बाजारात सोडल्या जात. या संपूर्ण प्रक्रियेत काही व्यावसायिक, काही पेट्रोल पंप आणि काही स्थानिक नेटवर्क सहभागी होते. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि काही इतर राज्यांमध्ये अशा प्रकारची नेटवर्क्स कार्यरत असल्याची माहिती आमच्याकडे होती. मी कोणत्याही विशिष्ट व्यक्तीचे नाव घेणार नाही, परंतु तपासात काही राजकीय संबंध समोर आले होते.

**स्मिता प्रकाश :** तुम्ही राजनैतिक-डिप्लोमॅटिक बॅग वापरल्याचाही उल्लेख केला आहे.

**आर.व्ही.एस. मणी :** त्या काळातील पाकिस्तानचे उच्चायुक्त शाहिद मलिक यांच्या कार्यकाळात अशा प्रकारच्या शंका अनेकदा व्यक्त झाल्या होत्या. नंतर पाकिस्तानच्या उच्चायुक्तालयातील एका वरिष्ठ अधिकाऱ्यानेही काही गोष्टींचा उल्लेख केला होता. दिल्लीतील पाकिस्तान उच्चायुक्तालयातील काही अधिकाऱ्यांवर बनावट नोटांच्या नेटवर्कशी संबंधित असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. त्याचप्रमाणे काही मालमत्ता व्यवहार करणारे आणि काही फार्महाऊसवर होणाऱ्या खासगी मेळाव्यांचाही या नेटवर्कशी संबंध असल्याची माहिती विविध तपासांमधून समोर आली होती. या ठिकाणी बनावट नोटांचे व्यवहार होत असल्याचे इनपूट आम्हाला मिळत असत. या मेळाव्यांना काही सरकारी अधिकारीही उपस्थित राहत असल्याच्या माहितीची नोंद आमच्या अहवालांमध्ये होती. जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद केवळ विचारसरणीवर आधारित नव्हता. त्यामागे एक मोठी आर्थिक व्यवस्था कार्यरत होती. मी गृहमंत्रालयात असताना यासंदर्भातील एक सविस्तर अहवाल तयार केला होता. त्या अहवालात विविध मालमत्ता, आर्थिक व्यवहार आणि सरकारी निधीचा वापर यांचा उल्लेख होता. २०१४नंतर नवीन सरकार सत्तेत आल्यानंतर मी तो अहवाल काही वरिष्ठ व्यक्तींपर्यंत पोहोचवला. शेषाद्री चारी यांनीही हा विषय सरकारपुढे मांडला. यानंतर काही वर्षांनी विविध ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या. त्या काळापर्यंत माझ्या अहवालाला सात वर्षे झाली होती. त्या सात वर्षांत अनेकांची मालमत्ता आणखी वाढली होती.

**स्मिता प्रकाश :** म्हणजे बनावट नोटा, अमली पदार्थ आणि सरकारी निधी हे तिन्ही स्रोत दहशतवादाच्या अर्थकारणाशी जोडलेले होते?

**आर.व्ही.एस. मणी :** दहशतवाद हा केवळ बंदुका आणि स्फोटकांवर चालत नाही. त्यामागे मोठे आर्थिक जाळे असते. बनावट नोटा, अमली पदार्थ, हवाला, सरकारी निधीचा गैरवापर आणि स्थानिक नेटवर्क या सर्वांचा एकत्रित वापर केला जात होता. या आर्थिक स्रोतांवर कठोर कारवाई केल्याशिवाय दहशतवाद पूर्णपणे रोखणे कठीण आहे.

**स्मिता प्रकाश :** या सर्व अनुभवांनंतर राष्ट्रीय सुरक्षेबाबत तुम्ही सरकारला एकच संदेश द्यायचा झाला; तर तो काय असेल?

**आर.व्ही.एस. मणी :** पंतप्रधान 'विकसित भारत'ची संकल्पना मांडत आहेत. त्याचबरोबर 'सुरक्षित भारत' हा राष्ट्रीय अजेंडा तितक्याच प्राधान्याने राबवला गेला पाहिजे. राष्ट्रीय सुरक्षा ही केवळ सीमांवर लढणाऱ्या जवानांची जबाबदारी नाही. ती प्रशासन, गुप्तचर यंत्रणा, राजकीय नेतृत्व आणि समाज या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. भूतकाळातील चुका विसरून चालणार नाही. त्यातून धडा घेऊन भविष्यासाठी अधिक सक्षम सुरक्षा व्यवस्था उभी करणे हेच सर्वांत महत्त्वाचे आहे.

**स्मिता प्रकाश :** मणीजी, इतक्या सविस्तरपणे तुमचे अनुभव आणि मत मांडल्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद.

**आर.व्ही. एस. मणी :** धन्यवाद!

(समाप्त)

---

ऐरोलीत एकाच दिवशी १३ ठिकाणी निष्कासन कारवाई

# अनधिकृत बांधकामांवर हातोडा

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली कार्यालय क्षेत्रांतर्गत बुधवारी १३ अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची धडक कारवाई करण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांबाबत केलेल्या जाहीर आवाहनाच्या अनुषंगाने दिलेल्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे आणि अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त संजय शिंदे यांच्या नियंत्रणाखाली आठही विभागांचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी ऐरोली विभागातील या धडक कारवाईप्रसंगी उपस्थित होते.



दरम्यान, अ‍ॅड. किशोर शेट्टी यांनी कोर्टात दाखल केलेल्या पीआयएल अवमान याचिका सीपी/६८५/२०२५मध्ये अनधिकृत विनापरवानगी इमारतींची छायाचित्रे सादर केली आहेत. या छायाचित्रांमध्ये नमूद अनधिकृत इमारतींना जी ऐरोली विभाग कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरून संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविणे आवश्यक होते, परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरू ठेवले होते. त्या अनुषंगाने ही तोडक कारवाई करण्यात आली.

दरम्यान, या कारवाईमध्ये (१) मनोज कुमार झा, रो हाऊस क्रमांक २०, से-०२, अभिलाषा सोसायटी, ऐरोली, (२) मोहम्मद मुबीन, सी-५५२, से-०२, ऐरोली, (३) सुनील नवरे, रो-हाऊस नं-१०, से-२ बी, ऐरोली, (४) संतोष सुखदेव प्रसाद, घर क्र. ९५/९७, गल्ली क्र. ५, शिवकॉलनी, से-०१, ऐरोली, (५) संजयकुमार दुबे, रो-हाऊस नं-११८, से-२ बी, ऐरोली, (६) संजयकुमार दुबे, रो-हाऊस नं-११९, से-२ बी, ऐरोली, (७) संजयकुमार दुबे, रो-हाऊस नं-१२०, से-२ बी, ऐरोली, (८) भीमराव पाटील, जी-८१, से ०३, ऐरोली, (९) मालमत्ताधारक, जी-१६६, से-०३, ऐरोली, (१०) विनीत विनय सिंह, रो-हाऊस नं. १०, प्रिती सोसा., से-२ सी, ऐरोली, (११) वैभव सदानंद सावंत, रो-हाऊस नं. ११, प्रिती सोसा., से-२ सी, ऐरोली, (१२) दिनानाथ धर्मराज यादव, रो-हाऊस नं १२, प्रिती सोसा., से-२ सी, ऐरोली, (१३) अवधूत लक्ष्मण पवार, रो-हाऊस नं. १३, प्रिती सोसा., से-२ सी, ऐरोली येथे अनधिकृतपणे बांधकाम सुरू केले होते.

---

# तरुणाई बिघडवणाऱ्या थीम पार्ट्या तत्काळ बंद करा!

## 'विहिंप'ची पोलीस आयुक्तांकडे मागणी

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

पब संस्कृतीच्या नावाखाली आयोजित करण्यात येणाऱ्या अश्लील 'थीमॅटिक' पार्ट्या, अमली पदार्थांचा वापर आणि तरुणींच्या कथित ब्लॅकमेलिंग प्रकरणांवर तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विश्व हिंदू परिषद, नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात विहिंपच्या शिष्टमंडळाने पोलीस आयुक्तांना निवेदन देत संशयास्पद पब व हॉटेल्सवर कारवाईची मागणी केली आहे.




विहिंपचे नवी मुंबई जिल्हा मंत्री स्वरूप गोरखनाथ पाटील यांनी निवेदनाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधताना सांगितले की, काही पब व हॉटेल्समध्ये आक्षेपार्ह स्वरूपाच्या 'थीम पार्ट्या' आयोजित केल्या जात असून त्यातून तरुण पिढीवर विपरीत परिणाम होत असल्याचा आरोप केला. या पार्ट्यांच्या माध्यमातून अमली पदार्थांचा वापर, तरुण-तरुणींना लक्ष्य करणे तसेच आक्षेपार्ह फोटो व व्हिडीओच्या आधारे ब्लॅकमेलिंगसारखे प्रकार होत असल्याचा दावा विहिंपने केला आहे. यावेळी पोलीस प्रशासनाने विशेष मोहीम राबवून कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

विहिंपने थीम पार्ट्यांवर बंदी, पब व हॉटेल्सवर कारवाई, परवाने रद्द करणे, अँटी-नार्कोटिक्स व सायबर सेलमार्फत तपासणी मोहीम राबविण्याची मागणी केली. तरुण पिढी, महिलांच्या सुरक्षेसाठी तातडीने कठोर पावले उचलावीत, अन्यथा विश्व हिंदू परिषद तीव्र आंदोलन करेल, असा इशारा स्वरूप गोरखनाथ पाटील यांनी दिला.

यावेळी धर्मजागरण कोकण प्रांतप्रमुख सुरेश सिंग राणा, नवी मुंबई बजरंग दल संयोजक शंकर संगपाळ, सहसंयोजक तेजस पाटील, मुकेश गांधी, संदीप सोनटक्के, निखिल घुडे, कुणाल पवार, नरेंद्र पांडे, राजू पटेल यांसह विहिंप व बजरंग दलाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# उरणमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात

**उरण : वार्ताहर**

उरण शहरसह ग्रामीण भागात गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. उरण शहरातील आनंदनगर येथील श्री स्वामी समर्थ मठ येथे पूजा, भजन आदींचे आयोजन करण्यात आले होते. केगाव विनायक कोळीवाडा येथील जगदीश कोळी यांचे एकमुखी दत्त मंदिर, विनायक येथील प्रशांत नवाळे यांचे श्री स्वामी मठ येथे पूजा, महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

नवीन शेवा येथील श्री स्वामी समर्थ मठ, मुळेखंड येथील श्री स्वामी समर्थ मठ, मोरा येथील साईबाबा मंदिर, नागाव (अंबिका वाडी) येथे पूजाआरती तसेच भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. येथील साईबाबा मंदिर, जीवन मुक्त स्वामी महाराज मठ आदी ठिकाणी विविध कार्यक्रम ठेवण्यात आले होते. ठिकठिकाणी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

केगाव विनायक येथील एकमुखी दत्त मंदिरात पारुबाई पांडुरंग कोळी, जगदीश कोळी, केगाव माजी सरपंच दीपेश जगदीश कोळी केगाव-विनायक उरण, निवृत्तीबाबा कुडाळ सातारा यांच्या सहकार्याने सालाबादप्रमाणे यंदाही विविध कार्यक्रम ठेवण्यात आले होते.



---

# विद्याभवनमध्ये आज मोफत आरोग्य, रक्तदान शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थीगृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात शुक्रवारी (दि. ३१) आणि शनिवारी (दि. १) ऑगस्ट रोजी संस्थेचे माजी कार्याध्यक्ष प्रा. कृ. ना. शिरकांडे यांच्या पंच्याहत्तराव्या वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य शिबिर आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. विद्याभवन शिक्षण संकुल, घाटकोपर व नेरूळच्या उभारणीत प्राचार्य कृष्णाजी नारायण शिरकांडे यांचा सिंहाचा वाटा आहे.

लायन्स हॉस्पिटल, सायन, मुंबई यांच्या सौजन्याने मोफत आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिर आयोजित केले आहे. सकाळी १० ते दुपारी ४ अशी शिबिराची वेळ आहे. सरांच्या वाढदिवसानिमित्त विद्याभवन शिक्षण संकुलात गेल्या अनेक वर्षांपासून आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिराचे आयोजन केले जात आहे. यावर्षीदेखील सर्व शिक्षक, माजी विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी या मोफत आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी लायन्स हॉस्पिटल, सायन, मुंबई येथील तज्ज्ञ डॉक्टर्स उपस्थित राहणार आहेत.

---

# नवी मुंबईतील स्मशानभूमींचे नूतनीकरण करण्यासाठी आमदार मंदा म्हात्रे आग्रही

## ग्रामविकासमंत्र्यांकडे बैठकीची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिका व सिडको क्षेत्रातील वेगाने वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता नागरिकांना अंत्यसंस्काराच्या अत्यंत संवेदनशीलप्रसंगी सन्मानपूर्वक, सुरक्षित आणि दर्जेदार सुविधा मिळाव्यात यासाठी आमदार मंदा म्हात्रे यांनी विशेष पुढाकार घेतला आहे. 'स्मशानभूमी व्हिजन' अंतर्गत नवी मुंबईतील सर्व भागांतील स्मशानभूमींचे नूतनीकरण व आधुनिकीकरण करण्यात यावे यासाठी ग्रामविकास व पंचायत मंत्री जयकुमार गोरे यांना पत्र पाठवून वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत तत्काळ बैठकीची आग्रही मागणी त्यांनी केली आहे.



यापूर्वी आमदार मंदा म्हात्रे यांनी दिवाळे गाव येथील स्मशानभूमीचा आधुनिक पद्धतीने कायापालट केला आहे. दिवाळे गावातील स्मशानभूमीत नागरिकांसाठी सुसज्ज आणि स्वच्छ परिसर, पक्की सुरक्षा भिंत, सिमेंटचे रस्ते, फरसबंदी, आधुनिक दहन शेड, बसण्यासाठी उत्तम बैठक व्यवस्था, पिण्याचे शुद्ध पाणी, हिरवळ-वृक्षारोपण आणि पुरेशी प्रकाश योजना उभारून या स्मशानभूमीचे एक आदर्श व सुंदर मॉडेल शहरात विकसित केले आहे. दिवाळे गावातील स्मशानभूमीच्या धर्तीवर संपूर्ण नवी मुंबईतील आणि विशेषतः गावठाणमधील स्मशानभूमींचा विकास व्हावा हा त्यांचा मुख्य उद्देश आहे.

मुंबईची गर्दी कमी करण्यासाठी वसलेल्या नवी मुंबई शहरात सिडको वसाहती, झोपडपट्टी व खासगी सोसायट्यांमधील वाढत्या लोकसंख्येचा अतिरिक्त भार गावठाणातील स्थानिक स्मशानभूमींवर पडत असल्याने अनेक ठिकाणी मूलभूत सुविधांची टंचाई जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर सर्व स्मशानभूमींमध्ये प्रदूषणमुक्त विद्युत व गॅस दाहिनी, सिमेंटचे रस्ते, फरसबंदी, आधुनिक जलनिस्सारण व्यवस्था, सुसज्ज प्रतीक्षागृह, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृहे, पुरेशी प्रकाशयोजना, सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे आणि सुरक्षा रक्षक तैनात करण्याची मागणी त्यांनी निवेदनात केली आहे.

परिसराचे सौंदर्यीकरण, पक्की सुरक्षा भिंत, भव्य प्रवेशद्वार, नामफलके, वृक्षारोपण तसेच ज्येष्ठ नागरिक, महिला व दिव्यांगांसाठी सुलभ सुविधा निर्माण करून सर्व स्मशानभूमींच्या दैनंदिन देखभालीसाठी स्वतंत्र 'मास्टर अ‍ॅक्शन प्लॅन' तयार करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# खोपोलीकरांच्या आरोग्यासाठी नगराध्यक्ष दक्ष

## साप्ताहिक बाजारातील व्यापाऱ्यांना स्वच्छतेबाबत सूचना

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध असलेला खोपोली शहराचा आठवडा बाजार म्हणजेच गुरुवार बाजार आता शिस्तीच्या विळख्यात येणार आहे. नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी व्यापाऱ्यांना सज्जड दम दिला असून कुठल्याही परिस्थितीत अस्वच्छता खपवून घेणार नाही, असा दम दिल्याने नगराध्यक्ष ॲक्शन मोडवर आल्याची चर्चा रंगली आहे .



परिसरात वाढती अस्वच्छता आणि वाहतूक कोंडी लक्षात घेता, खोपोली नगर परिषदेचे नगराध्यक्ष कुलदीपकभाई शेंडे यांनी व्यापाऱ्यांना अत्यंत महत्त्वाच्या आणि कडक सूचना दिल्या आहेत. खोपोली नगर परिषद कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या विशेष बैठकीत ते बोलत होते. या नियमांचे पालन न करणाऱ्या व्यापाऱ्यांवर नगरपरिषदेमार्फत थेट आणि कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला आहे. शहरातील वाहतूक व्यवस्था आणि शांतता अबाधित राखण्यासाठी नगराध्यक्षांनी काही महत्त्वाच्या परिसरांमध्ये व्यापाऱ्यांना दुकाने लावण्यास सक्त मनाई केली आहे.

हायको कॉर्नर परिसर , स्मशानभूमी समोर , मुस्लिम कबरस्थान ,अग्निशमन दल परिसर याठिकाणी दुकाने लावण्यास बंदी घालण्यात आली आहे. स्वच्छता आणि प्लास्टिक मुक्तीवर बैठकीत नगराध्यक्षांनी व्यापाऱ्यांना बाजार परिसरात सर्वोच्च स्वच्छता राखण्याचे आदेश दिले आहेत. बाजारात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट व्यापाऱ्यांनी स्वतः योग्य पद्धतीने लावणे बंधनकारक केले आहे. तसेच, शासनाने प्रतिबंधित केलेल्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर पूर्णपणे बंद करण्याचे निर्देशही त्यांनी दिले आहेत.

तसेच महत्वाचे म्हणजे या मोहिमेत पारदर्शकता आणि शिस्त राखण्यासाठी नगराध्यक्ष शेंडे यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींना ही स्पष्ट संदेश दिला आहे. गुरुवार बाजारातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यापाऱ्यांवर जेव्हा कारवाई केली जाईल, तेव्हा कोणत्याही स्थानिक नगरसेवकाने किंवा नागरिकांनी व्यापाऱ्यांची बाजू घेऊन मध्यस्थी करू नये, असे नगराध्यक्षांनी ठामपणे सांगितले आहे. शहराच्या हितासाठी आणि सुशोभीकरणासाठी सर्वांनी या निर्णयाला सहकार्य करावे, असे आवाहन नगरपरिषदेच्या वतीने नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी केले आहे.

# 'जंजिरासाठी कायम साथ देणार'

## मंत्री नितेश राणे यांचे आश्वासन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील ऐतिहासिक दुर्ग जंजिरा येथे शासकीय इतमामात कायमस्वरूपी भगवा ध्वज फडकविण्याच्या मागणीसाठी सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान व विविध सामाजिक संघटनांच्या शिष्टमंडळाने मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांची मंत्रालयात दुसऱ्यांदा भेट घेतली. यावेळी अलिबागचे आमदार महेंद्र दळवी हे देखील उपस्थित होते.

शिष्टमंडळाने जंजिरा किल्ल्यावर शासकीय सन्मानाने कायमस्वरूपी भगवा ध्वज फडकविण्याबाबतचे निवेदन मंत्र्यांना सादर केले. यावेळी मंत्री नितेश राणे यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद



देत "जंजिरासाठी कायम साथ देणार" असा शब्द पुन्हा एकदा दिल्याची माहिती शिष्टमंडळाकडून देण्यात आली.

रायगड जिल्ह्यातील ऐतिहासिक दुर्ग जंजिरा हा महाराष्ट्राच्या शौर्य, स्वाभिमान आणि सांस्कृतिक अस्मितेचा महत्त्वपूर्ण वारसा मानला जातो. त्यामुळे या दुर्गावर शासकीय इतमामात कायमस्वरूपी भगवा ध्वज फडकविण्यात यावा, अशी मागणी सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान व विविध सामाजिक संघटनांकडून सातत्याने करण्यात येत आहे.

या मागणीला रायगडसह संपूर्ण महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात लोकसमर्थन मिळत असून, भगवा ध्वज हा महाराष्ट्राच्या शौर्य, त्याग, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक असल्याने जंजिर्यावर त्याची शासकीय सन्मानाने स्थापना व्हावी, अशी जनभावना व्यक्त केली जात आहे.

# कडधान्य प्रक्रिया केंद्रांसाठी २५ लाखांपर्यंत अनुदान!

## शेतकरी उत्पादक संस्था, बचतगट व उद्योजकांना प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्क्यांपर्यंत मिळणार शासनाचे आर्थिक सहाय्य

**माणगाव : प्रतिनिधी**

कडधान्य पिकांचे मूल्यवर्धन करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी कृषी विभागाने काढणी पश्चात पायाभूत सुविधा उभारणीचे महत्त्वाकांक्षी धोरण जाहीर केले आहे. यानुसार कडधान्य प्रक्रिया व पॅकेजिंग केंद्र उभारणीसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल २५ लाख रुपये प्रति केंद्र, यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अनुदान दिले जाणार आहे. अशी माहिती माणगाव तालुका कृषी अधिकारी किरण पडवळकर यांनी प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकातून दिली.

यामुळे कडधान्य मूल्य साखळी अधिक सक्षम होऊन शेतकऱ्यांना उत्पादनाला योग्य बाजारभाव मिळण्यास मदत होईल. शेतकरी उत्पादक संस्था, क्लस्टर स्तर महासंघ, प्राथमिक कृषी पतसंस्था तसेच वैयक्तिक उद्योजक व अन्य पात्र संस्था या योजनेचा लाभ घेऊ शकतील. गट स्वरूपातील लाभार्थ्यां साठी संबंधित संस्था किमान दोन वर्षे विधिवत नोंदणीकृत व कार्यरत असणे आवश्यक असून, प्रकल्प खर्चाच्या किमान १५ टक्के रक्कम व कार्यभांडवलासाठी लागणारी मार्जिन रक्कम स्वतः उभारण्याची आर्थिक क्षमता असणे बंधनकारक आहे.

वैयक्तिक अर्जदाराचे वय किमान २१ वर्षे पूर्ण असावे लागेल आणि एका कुटुंबातील केवळ एकाच व्यक्तीस लाभ मंजूर केला जाईल. अनुसूचित जाती जमाती, महिला, डोंगराळ भाग तसेच आकांक्षित जिल्ह्यांतील अर्जदारांना प्राधान्य दिले जाईल. अनुदान केवळ यंत्रसामग्री खरेदी तसेच इमारत, गोदाम व साठवण सुविधा बांधकामासाठीच वापरता येईल; जमीन, वीज व मनुष्यबळ खर्चासाठी अनुदान अनुज्ञेय राहणार नाही. बांधकामासाठीच्या अनुदानाची मर्यादा एकूण पात्र अनुदानाच्या ३० टयांपर्यंत निश्चित करण्यात आली आहे. उर्वरित खर्च स्वतःचे भांडवल, बँक अथवा वित्तीय संस्थांकडील मुदत कर्ज, कृषी पायाभूत सुविधा निधी तसेच ग्रामीण विकास व सूक्ष्म उद्योग योजनांतील अनुदानाच्या माध्यमातून उभारावा लागेल. या योजनेसाठी बँक कर्ज घेणे अनिवार्य करण्यात आले आहे.

अर्ज अधिकृत संकेतस्थळा वरून तसेच विहित नमुन्यात कागदोपत्री स्वरूपातही स्वीकारले जातील. याबाबतची प्रसिद्धी वर्तमानपत्रे, संकेतस्थळ, समाज माध्यमे, आकाशवाणी व सार्वजनिक सूचना फलकांद्वारे केली जाईल. अर्ज सादर करण्यासाठी किमान ३० दिवसांचा कालावधी दिला जाईल. कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेस पात्र अर्ज संबंधित निधीच्या संकेतस्थळा कडेही अग्रेषित केले जातील. प्राप्त प्रस्तावांची छाननी व तांत्रिक मूल्यांकन जिल्हास्तरीय कडधान्य सुकाणू समिती करेल, ज्यामध्ये अभियानाशी सुसंगती, आर्थिक–तांत्रिक व्यवहार्यता, तंत्रज्ञान क्षमता, अर्जदाराचा पूर्वानुभव व उत्पादकांशी जोडणी हे निकष तपासले जातील. समितीच्या शिफारशी नंतरच अंतिम मान्यता दिली जाईल. मंजूर प्रकल्पांची भौतिक पडताळणी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या मार्फत केली जाईल. अनुदान वितरण दोन टप्प्यांत होईल यंत्रसामग्री बसवल्या नंतर ५० टक्के व केंद्र पूर्ण कार्यान्वित झाल्यानंतर उर्वरित ५० टक्के, संपूर्ण रक्कम थेट आधार–संलग्न बँक खात्यात जमा होईल. नव्याने उभारण्यात येणाऱ्या केंद्राची किमान क्षमता ताशी ३०० किलो ग्रॅम असणे बंधनकारक असून, यंत्रसामग्री भारतीय मानक ब्युरो अथवा तत्सम गुणवत्ता मानका नुसार असावी. बीजोत्पादन प्रशिक्षण व आकांक्षित जिल्ह्यांना बियाणे वितरणात प्राधान्य देण्याच्याही सूचना देण्यात आल्या आहेत. लाभार्थ्यांची संपूर्ण माहिती व अभिप्राय कडधान्य अभियानाच्या माहिती व्यवस्थापन प्रणालीवर अपलोड करणे बंधनकारक राहणार आहे. एकंदरीत, या योजनेमुळे कडधान्य उत्पादक शेतकऱ्यांना काढणी नंतरच्या टप्प्यावर मोठा आधार मिळून ग्रामीण भागातील रोजगार व उद्योजकतेलाही चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

## 'विद्यार्थ्यांचे भवितव्य सुरक्षित ठेवण्यासाठी तळा पोलीस तत्पर'

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या आणि युवा पिढीच्या सुरक्षिततेसाठी तळा पोलीस ठाणे आता तयार झाले आहे . "विद्यार्थ्यांचे भवितव्य सुरक्षित ठेवण्यासाठी तळा पोलीस ठाणे २४ तास तत्पर आहे," असा विश्वास सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष दराडे यांनी रायगड जिल्हा पोलिसांच्या अंतर्गत 'नशामुक्त भारत अभियान', 'जागतिक अमली पदार्थ विरोधी सप्ताह' आणि 'गुरुपौर्णिमेचे' औचित्य साधून कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात एका




मार्गदर्शन कार्यक्रमात बोलतांना दिला. यावेळी तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मंगेश देशमुख उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे, सचिव महेंद्र कजबजे आदि मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमात सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष दराडे यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षित भवितव्यासाठी एक ॲक्शन प्लॅन जाहीर केला.

# रायगड जिल्हा परिषदेची ग्रामपंचायत विकास आराखड्यावर एकदिवसीय कार्यशाळा

**अलिबाग : प्रतिनिधी**

पुनर्रचित राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान (आर जी एस ए ) २०२६–२७ अंतर्गत ग्रामपंचायत विकास आराखडा (जी पी डी पी ) प्रभावीपणे तयार करण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या वतीने मंगळवारी (दि .२८) कर्नाळा–पनवेल येथील हॉटेल विसावा येथे एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेचे उद्घाटन राजिपचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, वित्त व शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, कृषि व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील, समाजकल्याण सभापती नारायण डामसे, महिला व बालकल्याण सभापती रसिका केणी,



राजिप मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते, जिल्हा परिषद सदस्य मानसी दळवी, रंजना वास्कर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहूल कदम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) विशाल तनपुरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलनाने करण्यात आले. कार्यशाळेत जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य तसेच जिल्हा परिषदेचे विविध विभागांचे खातेप्रमुखांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

मार्गदर्शन करताना मान्यवरांनी लोकसहभागातून विकास नियोजन, शाश्वत विकास ध्येये (एस डी जी ), पंचायत प्रगती निर्देशांक ( पी ए आय ), १६वा वित्त आयोग, विभागीय योजनांचे अभिसरण आणि ई– ग्रामस्वराज या माध्यमातून परिणामकारक, पारदर्शक आणि उत्तरदायी विकास आराखडे तयार करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम, प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) विशाल तनपुरे यांनी वित्तीय नियोजन, विविध शासकीय योजनांचे प्रभावी अभिसरण, १६व्या वित्त आयोगाच्या निधीचा नियोजनबद्ध वापर आणि पुढील पाच वर्षांच्या विकासाची दिशा निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेल्या विकास आराखड्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच प्रविण प्रशिक्षक कमलेश कोरपे व प्रशांत पाटील यांनी विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया आणि ई– ग्रामस्वराज प्रणालीचा प्रभावी वापर यावर सखोल प्रशिक्षण दिले.

या कार्यशाळेमुळे पंचायत समिती आणि जिल्हा परिषद स्तरावर दूरदृष्टीपूर्ण, परिणामाभिमुख आणि शाश्वत विकास आराखडे तयार करण्यासाठी नवी दिशा मिळाल्याची भावना उपस्थित लोकप्रतिनिधी व अधिका–यांनी व्यक्त केली.

## पोलादपूर दशानेमा गुजराती महिला मंडळाकडून गौरी पूजन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

शहरातील दशानेमा गुजराती समाज महिला मंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे गौरी पूजन सप्ताह आयोजित करण्यात आला.दरवर्षी आषाढ महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सुरू होणाऱ्या गौरी पूजन सप्ताहाच्या प्रारंभी शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी सायंकाळी सहा वाजता बाजारपेठेतील मारुती मंदिरामध्ये गौरीचे आवाहन सात प्रकारची धान्य पेरुन करण्यात आले. यानंतर रोज संध्याकाळी गौरीमातेची आरती व पूजन पूर्ण सप्ताह काळात करून गुरुपौर्णिमेच्या दिवशी सायंकाळी सहा वाजता बाजारपेठेतून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली.

रात्री गौरीमातेचा जागर करताना महिलांनी विविध पारंपरिक खेळ सादर केले. यामध्ये बसफुगडी, फुगडी, गरबा, किस बाई किस असे अनेक पारंपरिक खेळ समाविष्ट होते. गुरुवारी ३० जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता उत्तरपूजा करून गौरीविसर्जन करून महिलांनी व्रत पूर्ण केले.

दशानेमा गुजराती समाज महिला मंडळाच्या अध्यक्ष केतकी शेठ, उपाध्यक्ष अर्चना शेठ, सचिव प्रिती बुटाला, खजिनदार मीना मपारा, सदस्या किर्ती शेठ, पूजा शहा, मृगया शहा,स्वरूपा तलाठी,सुलभा शेठ, विणा शेठ तसेच पहिल्या नगराध्यक्षा अश्विनी गांधी, नयना शेठ, सुरेखा शेठ, निमा शेठ, नेहा शेठ, भारती बुटाला, गुलाब शेठ, शीतला मेहता, अनिता मेहता, वनिता शहा, अपर्णा शेठ, सारिका शेठ, हेमा शेठ, दीपा तलाठी, स्वाती तलाठी, कांचन तलाठी, शर्मिला शेठ, रंजना गांधी, माजी नगराध्यक्ष स्नेहल मेहता आदीं महिला सहभागी झाल्या होत्या.



# माणगावात १० वर्षांत आमसभा झाली नाही!

## समस्या सोडवणूक, विकासासाठी व्यासपीठ आवश्यक

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील ग्रामस्थांच्या हक्काच्या आणि लोकशाहीच्या पायाभूत व्यासपीठ असलेल्या आमसभेला गेल्या दहा वर्षांपासून प्रशासनाने पूर्णपणे विस्मरणात टाकल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. सन २०१६ मध्ये कुणबी समाज हॉल येथे शेवटची आमसभा पार पडली होती, त्यानंतर आजतागायत ही महत्त्वाची बैठक एकदाही आयोजित करण्यात आलेली नाही. यामुळे तालुक्यातील नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांना वाचा फोडण्याचे व्यासपीठच हिरावले गेले असून, प्रशासनाच्या या दिरंगाईमुळे स्थानिक लोकशाही प्रक्रियेला जबर धक्का बसला असून माणगाव तालुक्यात लोकशाहीचा श्वास कोंडला गेल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून बोलताना व्यक्त होत आहेत. दहा वर्षांत आमसभा झाली नसल्याने नागरिकांचे प्रश्न, विकास आणि पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

आमसभा ही केवळ एक औपचारिक बैठक नसून नागरिकांना शासनाच्या निर्णय प्रक्रियेत थेट सहभागी करून घेणारे प्रभावी लोकशाही व्यासपीठ आहे. गावाच्या विकासाशी संबंधित महत्त्वाचे निर्णय याच व्यासपीठावरून नागरिकांच्या सहभागातून घेतले जात असल्याने आमसभेला "तालुक्याची संसद" असे संबोधले जायचे स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेच्या कलम ४० अन्वये ग्रामपंचायतींच्या स्थापनेची तरतूद करण्यात आली होती, मात्र त्यांना घटनात्मक दर्जा नव्हता. ही उणीव भरून काढण्यासाठी संसदेने १९९२ मध्ये ७३वी घटनादुरुस्ती मंजूर करत राज्यघटनेत नववा भाग समाविष्ट केला. कलम २४३ ते २४३–ओ अंतर्गत पंचायतराज व्यवस्थेला घटनात्मक अधिष्ठान प्राप्त झाले असून कलम २४३(ब) मध्ये ग्रामसभेची स्पष्ट व्याख्या करण्यात आली आहे. ही घटनादुरुस्ती २४ एप्रिल १९९३ पासून लागू झाल्याने हा दिवस देशभर "पंचायत राज दिन" म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्रातही ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ७ व ८ अन्वये आमसभा आयोजित करणे कायद्याने बंधनकारक आहे. असे असतानाही माणगाव तालुक्यात या कायदेशीर तरतुदीचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

आमसभेच्या माध्यमातून ग्रामपंचायतीच्या विकासकामांचा आढावा घेतला जातो, आर्थिक अहवाल व अंदाज पत्रकावर चर्चा होते, खर्चाला मंजुरी दिली जाते, नवीन योजनांच्या अंमलबजावणीवर विचारविनिमय होतो आणि नागरिकांच्या सूचना, तक्रारी व अडचणी थेट प्रशासनासमोर मांडल्या जातात. सभेत उपस्थित प्रत्येक सदस्याला मत मांडण्याचा समान अधिकार असून बहुमताच्या आधारे निर्णय घेतले जातात. मात्र गेल्या दहा वर्षांत ही प्रक्रियाच ठप्प असल्याने ग्रामपंचायतीच्या कारभारातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यावर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. आर्थिक व प्रशासकीय बाबींचा जाहीर खुलासा होत नसल्याने भ्रष्टाचाराला वाव मिळत असल्याची भीतीही नागरिकांमधून व्यक्त होत आहे. आमसभा न झाल्यामुळे शासकीय योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचणे बंद झाले असून, प्रशासन आणि जनता यांच्यातील विश्वासाचा दुवाही कमकुवत झाला आहे. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेले सामूहिक नियोजन खोळंबले असून, नागरिकांचे अनेक प्रलंबित प्रश्न वर्षानुवर्षे सुटलेलेच नाहीत. १९९२च्या ७३व्या घटना दुरुस्तीने आमसभेला घटनात्मक अधिष्ठान प्राप्त करून दिले असले, तरी माणगाव तालुक्यातील प्रशासनाच्या उदासीन आणि वेळखाऊ धोरणामुळे हा घटनात्मक हक्कच नागरिका पासून हिरावला गेल्याचे विदारक चित्र आहे. लोकशाही तळागाळा पर्यंत पोहोचवणारे हे महत्त्वाचे व्यासपीठ पुन्हा कार्यान्वित करावे आणि प्रलंबित आमसभा तातडीने आयोजित करावी, अशी मागणी आता तालुक्यातील नागरिका मधून जोर धरू लागली आहे.

# बाजिरे येथे गुरुपौर्णिमा उत्सव भक्तांच्या मांदियाळीत साजरा



**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड रत्नागिरी सिंधुदुर्ग सातारा पुणे तसेच ठाणे मुंबई नाशिक आणि राज्याच्या विविध भागात असंख्य भक्त मंडळी असलेल्या बाजीरे येथील सदगुरू बळीगिरीनाथ बाबांचा गुरुपौर्णिमा उत्सव बुधवारी भक्तांच्या मोठ्या संख्येने उपस्थित मांदियाळीत साजरा झाला.

तालुक्यातील बाजिरे येथील श्रीदत्त मंदिरामध्ये अधिष्ठान असलेल्या सदगुरू बळीगिरीनाथ बाबांच्या कृपाशीर्वादाने असंख्य भक्त मंडळींना आध्यात्मिक व आधिभौतिक दिलासा मिळाला असून या भक्तांकडून दरवर्षी गुरुपौर्णिमा उत्सव साजरा केला जातो.

बुधवारी दिवसभर राज्याच्या विविध भागांतून आलेल्या भक्त व भाविकांची रेलचेल आढळून आली. सकाळी श्रीगुरुदत्त अभिषेक झाल्यानंतर पाद्यपूजन करण्यात आले. सकाळी सातारा येथील सप्तक निर्मित स्वर सह्याद्रीचा हे श्रीदत्त भजन भाविकांसमोर सादर झाले. दुपारी परमपूज्य सदगुरु श्रीबळीगिरीनाथ महाराज यांचे भाविकांना उपदेशपर प्रवचन झाले. भाविकांच्या आप्तपरिवार व मित्रमंडळींनी सायंकाळी सदगुरु श्रीबळीगिरीनाथ महाराज यांचा शिष्य अनुग्रह घेण्यासाठी प्रचंड प्रमाणात गर्दी केली होती.

# नाशिकच्या दिलीप गावितची 'सुवर्ण' धाव




## राष्ट्रकुल स्पर्धेत ऐतिहासिक कामगिरी

**ग्लासगो : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल स्पर्धेत भारताने पॅरा ॲथलेटिक्समध्ये इतिहास रचला आहे. पुरुषांच्या १०० मीटर टी ४७ अंतिम शर्यतीत नाशिक जिल्ह्याच्या आदिवासी पाड्यातील दिलीप महादू गावित याने १०.७१ सेकंदांत राष्ट्रकुल स्पर्धेतील विक्रमी आणि हंगामातील सर्वोत्तम वेळ नोंदवत सुवर्णपदक जिंकले, तर मोहम्मद बासिल मोर्सिंगानकथ याने १०.८३ सेकंदांची हंगामातील सर्वोत्तम वेळ नोंदवत रौप्यपदक पटकावले.

दिलीप हा नाशिकच्या सुरगाणा तालुक्यातील तोरणडोंगरी या आदिवासी पाड्यातील खेळाडू आहे. उजव्या हाताला कोपरापासून दिव्यांग असलेला दिलीप पॅरा ॲथलेटिक्समधील टी ४७ गटात भारताचे प्रतिनिधित्व करतो. या गटात एका हाताची हालचाल, ताकद किंवा समन्वय मर्यादित असलेल्या अथवा एका हाताचा काही भाग नसलेल्या खेळाडूंना सहभागी होता येते.

सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेला दिलीप लहानपणापासूनच आपल्या आई-वडिलांसोबत शेतात काम करायचा. अवघ्या पाच-सहा वर्षांचा असताना झाडावरून पडल्यामुळे त्याच्या उजव्या हाताला गंभीर दुखापत झाली. वेळेत योग्य उपचार न मिळाल्यामुळे ती जखम गँग्रीनमध्ये बदलली आणि अखेर त्यांचा हात कोपराच्या खालून कापावा लागला. दिलीपने देशासाठी सुवर्णपदक जिंकले आणि ग्लासगोमध्ये तिसऱ्यांदा भारताचे राष्ट्रगीत दुमदुमले.

### मोहम्मद बासिलला रौप्यपदक

याच स्पर्धेत भारताच्या मोहम्मद बासिल मोरासिंगनाकथ याने उत्कृष्ट प्रदर्शन करत रौप्यपदक पटकावले. केरळचा मोहम्मद बासिल याचा जन्म झाला तेव्हाच त्याला उजवा हात नव्हता. ज्यावेळी राष्ट्रकुल स्पर्धेची निवड चाचणी झाली होती त्यावेळी बासिलने १०.६४ सेकंदात पूर्ण करत आता सुवर्ण जिंकलेल्या दिलीप गावितला मागे टाकले होते, मात्र फायनल सामन्यामध्ये दिलीपने बाजी मारत सुवर्णपदकावर नाव कोरले.

# अनुभवी अजिंक्य रहाणेची आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा अनुभवी आणि विश्वासू फलंदाज अजिंक्य रहाणे याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. आपल्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवर एक भावूक व्हिडीओ शेअर करत रहाणेने निवृत्तीचा निर्णय जाहीर केला.

रहाणेने आपल्या पोस्टमधून भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय), सहकारी खेळाडू, प्रशिक्षक, सपोर्ट स्टाफ आणि जगभरातील चाहत्यांचे आभार मानले. आपल्या क्रिकेट प्रवासातील प्रत्येक क्षण अविस्मरणीय असल्याचे सांगत त्याने चाहत्यांच्या प्रेम आणि पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

शांत स्वभाव, संयमी फलंदाजी आणि संकटाच्या काळात संघाला सावरण्याची क्षमता या जोरावर अजिंक्य रहाणेने भारतीय क्रिकेटमध्ये वेगळी ओळख निर्माण केली. त्याने भारतासाठी कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० क्रिकेटमध्ये प्रतिनिधित्व केले. विशेषतः कसोटी क्रिकेटमध्ये त्याच्या फलंदाजीची मोठी प्रशंसा झाली. परदेशातील कठीण परिस्थितीत त्याने अनेक महत्त्वपूर्ण खेळी करत भारताच्या विजयात मोलाची भूमिका बजावली.




**मी या खेळासाठी माझे सर्वस्व दिले. दररोज, प्रत्येक इनिंगमध्ये, फलंदाजीची मिळालेली प्रत्येक संधी... माझे स्वप्न नेहमीच भारताची कॅप घालण्याचे होते. मी एकाच नियमाने आयुष्य जगलो देश आणि संघाला नेहमी स्वत:पेक्षा आधी ठेवायचे. मी हा खेळ पूर्ण प्रामाणिकपणे खेळलो. माझ्यासाठी पुढे जाण्याची आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेट तसेच सर्व फॉरमॅटमधून निवृत्ती घेण्याची योग्य वेळ आली आहे.**
**-अजिंक्य रहाणे**

अजिंक्य रहाणेच्या कारकिर्दीतील सर्वात खास क्षणांपैकी एक म्हणजे २०२०-२१ ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील ऐतिहासिक कसोटी मालिका विजय. विराट कोहलीच्या अनुपस्थितीत त्याने भारतीय संघाचे नेतृत्व करत ऑस्ट्रेलियाविरुद्ध संस्मरणीय विजय मिळवला होता.

# आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय पुरुष हॉकी संघाची घोषणा; हरमनप्रीत सिंगकडे नेतृत्व

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

हॉकी इंडियाने जपानमधील ऐची-नागोया येथे १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या २०व्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी २० सदस्यीय भारतीय पुरुष हॉकी संघाची घोषणा केली. स्टार डिफेंडर आणि ड्रॅग-फ्लिक विशेषज्ञ हरमनप्रीत सिंग संघाचे कर्णधारपद भूषवणार असून अनुभवी मिडफिल्डर मनप्रीत सिंग उपकर्णधार असेल.




भारत आशियाई क्रीडा स्पर्धेचा गतविजेता आहे. हरमनप्रीतच्याच नेतृत्वाखाली भारतीय संघाने २०२३च्या हांगझू आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून पॅरिस ऑलिम्पिकमध्ये स्थान मिळवले होते. यावेळी विजेतेपद कायम राखणे आणि लॉस एंजेलिस २०२८ ऑलिम्पिकसाठी थेट प्रवेश मिळवणे हे संघाचे ध्येय असेल.

भारतीय संघाला यजमान जपान, दक्षिण कोरिया, बांगलादेश, श्रीलंका आणि इंडोनेशिया यांच्यासोबत 'अ' गटात स्थान देण्यात आले आहे. भारत २० सप्टेंबर रोजी इंडोनेशियाविरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करेल. त्यानंतर संघ २२ सप्टेंबर रोजी श्रीलंका, २४ सप्टेंबर रोजी दक्षिण कोरिया, २६ सप्टेंबर रोजी जपान आणि २८ सप्टेंबर रोजी बांगलादेशचा सामना करेल.

# जिल्हास्तरीय व्हॉलिबॉल स्पर्धेत गोरेगाव संघ विजेता

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा मोहल्ला व्हॉलिबॉल क्लबच्या वतीने येथील अंजुमन उर्दू हायस्कूलच्या मैदानावर दोन दिवसीय जिल्हास्तरीय व्हॉलिबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत यजमान रोहा संघाला नमवून पाहुण्या फलक गोरेगाव इलेव्हन संघाने बाजी मारत पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले.



स्पर्धेत रोहा (ए टीम), रोहा ( बी टीम), महाड, वहूर, दापोली, पनवेल, बदलापूर आणि गोरेगाव अशा आठ नामवंत संघानी सहभाग घेतला होता. सामने पाहण्यासाठी असंख्य फुटबॉलप्रेमी तरुणांनी उपस्थिती लावली होती.

विजेत्या फलक गोरेगाव इलेव्हन संघाला प्रथम क्रमांकाचे ३० हजार रुपये व आकर्षक चषक तसेच उपविजेत्या रोहा (ए टीम) संघाला १५ हजार रुपये व आकर्षक चषक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

# प्रतिका रावल काउंटी चॅम्पियनशिपमध्ये खेळणार

## वॉरविकशायर बेअर्स क्लबकडून करारबद्ध

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंग्लिश काउंटी क्लब वॉरविकशायर बेअर्सने भारतीय सलामीवीर प्रतिका रावलला २०२६च्या देशांतर्गत हंगामाच्या अखेरपर्यंत करारबद्ध केले आहे. क्लबने ही घोषणा केली.

१९ ऑगस्ट रोजी एडजबॅस्टन येथे यॉर्कशायरविरुद्ध होणाऱ्या एकदिवसीय चषक सामन्यासाठी प्रतिका निवडीसाठी उपलब्ध असेल. २५ वर्षीय प्रतिकाने २०२४मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले आणि ५० षटकांच्या फॉरमॅटमध्ये जगातील सर्वोत्तम सलामीवीरांपैकी एक म्हणून स्वतःला लवकरच स्थापित केले. तिने तिच्या पहिल्या १० एकदिवसीय सामन्यांमध्ये जवळपास ७०च्या सरासरीने ६००हून अधिक धावा केल्या. २०२५च्या विश्वचषक स्पर्धेत भारताला विजेतेपद मिळवून देण्यात तिने महत्त्वाची भूमिका बजावली.

वॉरविकशायर बेअर्स महिला संघाचे मुख्य प्रशिक्षक अली मैदन म्हणाले, हा आमच्या संघासाठी एक उत्कृष्ट करार आहे आणि प्रतिकाचे एडजबॅस्टनमध्ये स्वागत करताना आम्हाला आनंद होत आहे. सध्या एकदिवसीय चषकाच्या गुणतालिकेत आमचे स्थान चांगले आहे. प्रतिकासारख्या प्रतिभावान खेळाडूच्या समावेशामुळे आमचा संघ आणखी मजबूत होईल आणि आम्ही हा हंगाम सकारात्मकतेने संपवण्याची आशा करतो.



निवडीबद्दल प्रतिका म्हणाली, वॉरविकशायरमध्ये सहभागी होत असल्याचा मला खूप आनंद आहे. मी या क्लबबद्दल खूप चांगल्या गोष्टी ऐकल्या आहेत. येथे पदार्पण करण्यासाठी आणि संघाला सर्वतोपरी मदत करण्यासाठी मी उत्सुक आहे. इंग्लंडमध्ये खेळून स्वतःला सिद्ध करणे हा माझ्यासाठी एक उत्तम अनुभव असेल तसेच जागतिक क्रिकेटमधील सर्वात प्रतिष्ठित मैदानांपैकी एक असलेल्या एडजबॅस्टनवर खेळण्यासाठी मी आतुरतेने वाट पाहत आहे.

# नेमारचा आंतरराष्ट्रीय फुटबॉलला अलविदा!

**ब्राझिलिया : वृत्तसंस्था**

ब्राझीलचा स्टार फुटबॉलपटू नेमार ज्युनियरने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. या ३४ वर्षीय फुटबॉलपटूने आपल्या संघासाठी सातत्याने चांगली कामगिरी केली, पण त्याला विश्वचषक जिंकण्यात अपयश आले. निवृत्तीची घोषणा केल्यानंतर तो भावूक झाला.




नुकत्याच झालेल्या फिफा विश्वचषक स्पर्धेत ब्राझीलच्या संघाने चांगली कामगिरी केली नाही. स्पर्धेसाठी एक प्रबळ दावेदार मानला जाणारा हा संघ अव्वल चारमध्ये मात्र स्थान मिळवू शकला नाही. स्पर्धेदरम्यान नेमारला दुखापतीचाही सामना करावा लागला, ज्यामुळे तो बराच काळ बेंचवर बसून होता. त्याने आता आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती जाहीर केली आहे, पण तो क्लबसाठी खेळणे सुरू ठेवेल. नेमार हा ब्राझीलचा आतापर्यंतचा सर्वाधिक गोल करणारा फुटबॉलपटू आहे. त्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक अविस्मरणीय क्षण निर्माण केले, पण त्याचे विश्वचषकाचे स्वप्न अपूर्ण राहिले.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com